
## प्रकरण तिसरे

## श्री रत्नाप्पा कुंभार व सहकार चळवळ

# कोल्हापूर जिल्हा




आ. क्र. ३.१

## प्रकरण तिसरे

### श्री रत्नाप्पा कुंभार व सहकार चळवळ --

मानव जातीच्या सर्वांगीण विकासासाठी "सहकार" चळवळीचा उगम झाला आहे. सहकारी चळवळी द्वारे आर्थिक व सामाजिक क्षेत्रात प्रशंसनिय कार्य घडून येत आहे. 'सहकार' हा शब्द मुळ लॅटीन "co-operari" या शब्दापासून आलेला आहे. "co" याचा अर्थ 'सह' आणि 'operari' याचा अर्थ काम करणे म्हणजेच सहकार्याने काम करणे असा सहकाराचा अर्थ होतो.[१]

सहकारी चळवळीचा उगम इंग्लंडमध्ये १८व्या व १९ व्या शतकात झालेल्या औद्योगिक क्रांतीतून झाला. व त्यातूनच इंग्लंडमध्ये भांडवलशाही अर्थव्यवस्था उदयास आली. भांडवलशाही अर्थ व्यवस्थेच्या विकासा बरोबर या अर्थ व्यवस्थेत अनेक प्रकारचे दोष निर्माण झाले. उद्योग, व्यापार इ. क्षेत्रात मक्तेदारी सुरु झाली, त्यामुळे आर्थिक सत्तेचे प्रचंड प्रमाणावर केन्द्रीकरण झाले. आपल्या आर्थिक शक्तीच्या जोरावर भांडवलदार वर्गाने कामगारांना कमी वेतन, जास्त वेळ काम, विश्रांतीच्या वेळा कमी, कामगार कल्याण योजनेचा अभाव ही धोरणे राबवल्यामुळे कामगारांची प्रचंड प्रमाणावर पिळवणूक होऊन लागली. ग्राहकांना व्यापारी मन मानेल त्या किंमतीला वस्तु विकू लागले. त्यामुळे ग्राहकांचे शोषण होऊन लागले. तसेच वस्तुचा दर्जा कमी प्रतिचा ठेवत असत. जास्तीत जास्त फायदा मिळविण्याचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी व्यापाऱ्यांनी अनेक क्षेत्रात अनिती, अप्रामाणिकपणा, भ्रष्टाचार इ.चा. अवलंब केला. दारिद्र्यात पिचत पडलेला कामगार वर्ग व कामगारांचे शोषण करणारा भांडवलदार वर्ग यांचा संघर्ष सुरु झाला.[२]

औद्योगिक क्रांतीमुळे निर्माण झालेले दारिद्र्य व ग्राहकांचे शोषण याला आळा घालण्यासाठी आधुनिक सहकारी चळवळीचा प्रारंभ झाला ही चळवळ

म्हणजे इंग्लंडमधील औद्योगिक क्रांतीचे अपत्य होय. १८४४ मध्ये इंग्लंडमध्ये रॉशडेल पायोनिअर्सनी सामान्य माणसाचे शोषण थांबविले पाहिजे या विचारातून 'दि रॉशडेल इक्विटेबल पायोनिअर्स सोसायटी' स्थापन केली.[3] ही सहकारी चळवळीच्या इतिहासातील आद्य संस्था होय. रॉशडेलच्या विणकरांना अचूक व उपयोगी असे मार्गदर्शन रॉबर्ट ओवेन यांचेकडून लाभले होते. त्यामुळे रॉबर्ट ओवेन यांना आधुनिक काळातील सहकारी चळवळीचे जनक म्हटले जाते. भांडवलशाहीतील गुलामगिरी व दुरगामी दोषांचे उच्चाटन करण्यासाठी सहकाराचा जन्म झाला असून ही चळवळ विश्वव्यापी बनली आहे.

## सहकाराच्या व्याख्या --

सहकाराच्या व्याख्या अनेक विचारवंतांनी केल्या आहेत त्यापैकी काही प्रमुख व्याख्या पुढे दिल्या आहेत ---

सी.आर.फे -- " समाजातील दुर्बल घटकांनी निःस्वार्थी भूमिकेतून संयुक्तपणे व्यवहार करण्यासाठी व जिथे व्यवहार सभासद सदस्यत्वाची कर्तव्य पेलण्यास तयार आहेत आणि सभासद ज्या प्रमाणात व्यवहार करतात त्या प्रमाणात त्यांना संस्थेतील लाभांश उपलब्ध होईल या अटीवर चालणाऱ्या संघटनेस सहकारी संघटना म्हणतात "[4]

एच.कॅलव्हर्ट -- " आर्थिक हितसंबंधाच्या उन्नतीसाठी स्वेच्छेने आणि समानतेच्या भावनेने व्यक्तींनी एकत्र येऊन निर्माण केलेली संघटना म्हणजे सहकार होय.[5]

प्रा.पॉल लॅम्बर्ट- " स्वतःच्या उपयोगासाठी व्यक्ती समूहाने स्थापन केलेली,आणि नियंत्रित केलेली लोकशाहीच्या नियमानुसार चालवलेली आणि सभासदांच्या व एकूण समाजाच्या सेवेसाठी निर्माण केलेली संघटना म्हणजे सहकारी संस्था होय.[6]

## भारतातील सहकारी चळवळीचा उदय --

भारतातील सहकारी चळवळीचा प्रारंभ ग्रामीण जनतेच्या दारिद्र्यातून व पिळवणूकीतून झालेला आहे. भारतात इंग्रज राजवट स्थिर होत असतानाच इंग्लंडमधील औद्योगिक क्रांतीचे परिणाम भारतातील खेड्यापाड्यातून चालणाऱ्या लहान मोठ्या उद्योगधंद्यावर झाला. भारतातील लघु व कुटीर उद्योग इंग्लंडमधील मोठ्या कारखान्यांशी स्पर्धा करण्यास असमर्थ ठरले. त्यामुळे व्यवसायातील कारागीर व कामगार बेकार झाले. देशात बेकारी वाढली, शेतीवरचा भार वाढू लागला त्याच बरोबर वारंवार पडणाऱ्या दुष्काळामुळे शेतकरी सावकाराच्या पूर्णपणे विळख्यात अडकले गेले. सावकाराच्या विळख्यातून बाहेर काढण्यासाठी व आर्थिक मुक्तता मिळवण्यासाठी संघटित प्रयत्नांची आवश्यकता होती सन १९०१ च्या फॅमीन कमिशनने ॲग्रीकल्चर बॅन्क ऑफ इजिप्त सारख्या सहकारी पतपेढ्या भारतात सुरू करण्याची शिफारस केली. सर एडवर्ड लॉ यांच्या शिफारशीनुसार १९०४ मध्ये सहकारी पतपुरवठा संस्था विषयक कायदा करण्यात आला.[७] या कायद्याचे वर्णन डॅनियल हॅमिल्टन यांनी "दारिद्र्याकडून समृध्दीकडे जाणारा मार्ग" अशा शब्दात केले आहे.[८] या सहकारी कायद्याने सहकारी चळवळीची मुहूर्त मेढ भारतात रोवली. या कायद्यामुळे देशातील सामाजिक व आर्थिक इतिहासाला नवे वळण लागले. १९०४ च्या कायद्यातील दोष व उणिवा दुर करण्यासाठी सन १९१२ मध्ये नवीन सहकारी कायदा करण्यात आला. या कायद्यामुळे भारतातील सहकारी चळवळीला उत्तेजन मिळाले. व सहकारी क्षेत्राला व्यापक स्वरुप मिळाले.[९]

## महाराष्ट्रातील सहकारी चळवळ ---

आज महाराष्ट्राच्या अर्थकारणात सहकारी संस्थाना असामान्यसाधारण महत्व प्राप्त झाले आहे. विशेषत: कोल्हापूर, सांगली, अहमदनगर जिल्ह्यातील खेड्या खेड्यातून हे चित्र स्पष्ट दिसून येत आहे. महाराष्ट्रात सहकारी क्षेत्रात आजवर थोर नेत्याचे मार्गदर्शन लाभले आहे. धनंजयराव गाडगीळ, कै. वैकुंठभाई मेहता, पद्मश्री विखे-पाटील, पद्मश्री कै. वसंतदादा पाटील व कोल्हापूरचे

सहकारमहर्षी तात्यासाहेब मोहिते अशा मातब्बर मंडळींनी सहकाराचे नैतिक अधिष्ठान भक्कम पायावर घालून ठेवले आहे.[१०] सर्वत्र त्याची जोपासना करण्यासाठी या सहकारी समाज पुरुषांचे आदर्श डोळ्यापुढे ठेवून आजचे सहकार महर्षी वाटचाल करीत आहेत. महाराष्ट्रात तर या शतकाच्या पहिल्या दशकातच सहकाराबाबतचे प्रबोधन घडवून आणण्यामध्ये श्री.गो.कृ.देवधर आणि श्री साने यानी विशेष प्रयत्न केले.

महाराष्ट्राने सहकार चळवळीत भारतात एक आदर्श घालून दिला आहे. विशेष करुन कोल्हापूर जिल्ह्यातील कोल्हापूर, वारणानगर, शिरोळ व इचलकरंजी नगरीमध्ये सहकार चळवळी द्वारे आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात नवे पर्व निर्माण केले आहे.

इचलकरंजी परिसरातील सहकार चळवळीचा प्रारंभ --

सन १९१२ मध्ये सहकाराबाबतच्या दुसऱ्या कायदाने इचलकरंजीसारख्या संस्थानामध्ये सहकारी संस्था उभ्या करण्यात परवानगी दिली होती व त्यामुळे सहकारी संस्था उभारण्यात बाबासाहेब घोरपडे यांनी प्रारंभ केला.[११] त्यानी अनेक ग्रामीण व नागरी सहकारी पतपेढया तसेच सहकारी बँकेची उभारणी केली. अनेक सहकारी समाज पुरुषाचे आदर्श डोळ्यापुढे ठेवून आजचे सहकार महर्षी रत्नाप्पा कुंभार यांनी आपल्या भागासाठी सहकारी चळवळी द्वारे कामास आरंभ केला. त्यानी राष्ट्रीय बाण्याने, निःस्पृह वृत्तीने सेवाभाव व जबाबदारी या त्रिवेणी संगमाने आपल्या भागामध्ये ' सहकारी जगत ' निर्माण केले.

सहकारी चळवळीतील रत्नाप्पा कुंभारांचे योगदान --

स्वातंत्र्य प्राप्त होताच श्री आण्णांनी रणवेश उतरवून असहकारची शस्त्रे बाजूला ठेवून सहकाराची शस्त्रे देशाच्या पुर्नरचनेसाठी व दारिद्र्याशी लढा देण्यासाठी हाती घेतले. त्यावेळी स्वातंत्र्योत्तर काळामध्ये मिळालेल्या स्वराज्याचे ' सुराज्य ' करावयाचे नवे वारे सर्वत्र संचारले होते, नव्या आशा आकांक्षाना पालवी फुटू लागली होती. लोकशाही मार्गाने पुढे जात असताना

धर्म, जात, प्रदेश, भाषा या विषयीच्या संघर्षाने तोंड वर काढले त्यामुळे राष्ट्रीय भावनेला तडे जावू लागले. परकीय आक्रमणाला तोंड द्यावे लागले हे सर्व घडत असताना सामान्य माणसाकडे सर्वांचे दुर्लक्ष झाले. स्वाभाविकपणे अन्यायाबद्दल चिड, देशाबद्दल प्रेम या सारख्या बाबी संघर्षात येऊ लागल्या. स्वार्थी वृत्ती वाढू लागली. सामान्य माणसाची ही दयनिय अवस्था आण्णांच्या विधायक कार्याची प्रेरणा ठरली. स्वातंत्र्याच्या शिल्पकाराने सहकाराची कास धरुन रांगडी, भोळी-भाबडी, पैशाला महाग असलेली, कमी शिकलेली पण श्रध्दाळू सहकाऱ्यांची फौज निर्माण केली. सहकाराचा प्राणमंत्र या ध्येयसक्तीने ते पुढे सरसावले. त्यासाठी त्यांनी इचलकरंजीतील लवणूरच्या माळावर सहकाराचे मंदिर उभे करण्याचा मानस केला.[१२]

## रत्नाप्पा कुंभारांच्या सहकारी चळवळीतील कार्याचा प्रारंभ ---

रत्नाप्पा कुंभारांच्या विधायक कार्याचा प्रारंभ १९५५ च्या श्री पंचगंगा सहकारी साखर कारखान्याच्या स्थापनेपासून होतो.[१३] त्यानी गोर गरिबांच्या झोपडीपर्यन्त पंचगंगेच्या मदतीचा हात पोहचिवला. सामान्य माणसाचे जीवन समृध्द करण्यासाठी श्रमातून संपन्नतेकडे जाण्याचा नव्या काळातील नवा मार्ग आण्णानी आखून दिला. निर्भय वृत्तीने समाज विकासासाठी आण्णानी सतीचे वाण स्विकारले. त्यानी सत्तेची आराधना न करता जनता ही एक प्रचंड शक्ती आहे हे जाणून त्यानी या शक्तीच्या विकासासाठी आपले जीवन वेचले. जनसामान्यांचे अश्रु पुसले, त्यांच्या जीवनात आनंद निर्माण करण्याचे कार्य केले.

समाजातील वंचित व दुर्बल घटकांना सहकार क्षेत्रात मोठे स्थान देणे आणि सर्वसामान्य माणसाचे जीवनमान उंचावणे हे आण्णाचे सहकार चळवळीचे मुख्य उद्दिष्ट होते. शेतकऱ्याला सावकाराच्या विळख्यातून मोकळे करुन शेती उत्पादन वाढीसाठी त्यास आर्थिक मदत करावी हाच उद्देश डोळ्यासमोर ठेवून सहकार चळवळीच्या साहाय्याने आण्णानी पंचगंगा व कृष्णा परिसरातील कायापालटास सुरुवात केली.

रत्नाप्पा कुंभारांचा कामगाराकडे पहाण्याचा दृष्टिकोण --

भारताच्या समृध्दतेचे शिल्पकार म्हणजे आपले कामगार अशी आण्णाची मनोमन श्रध्दा असल्यामुळे शहराकडे धाव घेणा-या कामगारांची संख्या कमी करून खेडी सुधारणे या उद्देश्य पूर्तीसाठी आण्णांनी दुसरी एक सहकारी संस्था स्थापन केली ती म्हणजे कोल्हापूर जिल्हा शेतकरी विणकरी सहकारी सुत गिरणी होय. या दोन सहकारी संस्थाना संस्कार केन्द्रे म्हणजे आण्णांच्या " विना संस्कार नही सहकार " या ब्रीद वाक्यानुसार उचित वाटते.

सहकारातून समाजपरिवर्तन हा दृष्टिकोन ठेवून पंचगंगेच्या परिसरातील १०० गावांच्या उन्नतीसाठी एक पंचवार्षिक योजना कार्यान्वित केली. सुत गिरणी, साखर कारखाना, शेतकरी खरेदी विक्री संघ, दुध संस्था, पतसंस्था या सारख्या अनेक सहकारी संस्थाचे जाळे या परिसरात निर्माण केले आहे. या संस्थाच्या रुपाने कर्तबगारीचे एक नवे चैतन्य या परिसरात अवतरले. जांभळी, यड्राव, कोथळी, रुई, चंदूर, कुपरी, शिरवणी, साजणी, कोरोची, शिरदवाड इ. हातकणंगले व शिरोळ तालुक्यातील गावाचा चेहरा मोहराच बदलून गेलेला आहे.[१४]

आण्णांच्या मते माणसाचे माणसा जवळ येणे हे प्रगतीचे द्योतक आहे. माणसा माणसातील सद्भाव, सद्भिरुचि शुचिता यांचे शिखर जसे उंचावते तशी माणसे एकमेकांशी एकजीव होतात हा एकजीव होणा-या प्रक्रियेला आण्णा सहकार समजतात. माणसा माणसातील सहकार हाच आण्णांनी देव मानला " एकमेका सहाय्य करु अवघे धरु सुपंथ " हा संत तुकारामांचा अभंग आण्णांनी कृतित आणला व सहकार क्षेत्रातील सर्व कार्यकर्त्यांना मार्गदर्शकाचे कार्य केले.

रत्नाप्पा कुंभार यांचे सहकारा बाबतचे विचार --

पश्चिम महाराष्ट्रात सहकारी क्षेत्रात उत्तुंग कामगिरी केलेल्या रत्नाप्पा आण्णांचे सहकारासंबंधी विचार व्यापक आणि परिपक्व आहेत. सहकार ही समर्थांची तलवार असून असमर्थांची ढाल आहे. या उक्तीनुसार समाजातील सर्व

स्तरातील लोकांना बरोबर घेऊन समाजोन्नतीची पताका खांद्यावर घेऊन अविरत कार्य करणारा, विकासाची गंगोत्री घराघरात पोहोचविणारा एक महान तपस्वी म्हणजे रत्नाप्पाण्णा कुंभार, तळमळ, प्रामाणिकपणा, जिद्द, शौर्य, चिकाटी आणि विचारावर व्यापक निष्ठा हे आण्णांचे गुण. बहुजन समाजा विषयी तर त्यांना अमाप जिव्हाळा, इचलकरंजी परिसरात चैतन्य निर्माण करणाऱ्या आण्णांचे सहकार विषयक विचारही प्रगल्भ स्वरूपाचे आहेत.

आण्णांनी आतापर्यन्त सुमारे ४० वर्षा पेक्षा जास्त कार्य केले आहे त्यांचे कार्य व मार्गदर्शन केवळ कोल्हापूर जिल्हापुरतेच मर्यादित न राहाता ते महाराष्ट्रातील इतर जिल्ह्यातही पसरले आहे. मराठवाडा, विदर्भ, रत्नागिरी या सारख्या भागातही आण्णांनी सहकारी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले आहे. अनेक सभा, शिबिरे, चर्चा सत्रात आण्णांनी आपले विचार घन दिले आहे. सहकारी कार्यकर्ते व सहकारी सेवक, प्रशिक्षक यांच्या समोर त्यांनी असंख्यवेळा भाषणे दिली आहेत.

नागपूर येथील धनंजयराव गाडगीळ सहकार प्रशिक्षण महाविद्यालयात ' सहकार संस्थातील परस्पर संबंध ' या विषयावर एक परिसंवाद आयोजित केला होता, त्या परिसंवादात दे. भ. रत्नाप्पा कुंभार यांनी आपले खालील विचार प्रकट केले.

सहकाराचा उदय --

आण्णांच्या मते ' सहकार ' या शब्दाचा आज जरी गाजावाजा होत असला तरी फार प्राचिन काळापासून जनहितासाठी अनेक सामुदायिक प्रयत्न झालेले आहेत. आपल्याकडे प्राचिन काळी चांभार, कुंभार, सोनार, लोहार अशा बलुतेदारांच्यात आणि कुणबी लोकांत्यामध्ये सहकार्य करण्याची भावना होती. याच द्वारे समाज कार्याचा गाडा चालत असे त्यामुळे सहकार हा शब्द आज जरी रूढ झाला असला तरी त्याला फार मोठी परंपरा आहे. '

सहकाराची व्याख्या --

' काही समान साध्यासाठी एकत्र येऊन विचारविनिमय करून जेव्हा जनहिताची कृती केली जाते तिला सहकार म्हणतात. मानवामध्ये उपजतच

सहकार्याची भावना असे. सहकार हा शब्द सामान्य जनतेच्या सर्वांगिण विकासाचा अविभाज्य घटक बनला आहे. सामुदायिक प्रयत्नातून जनहित साधणे हेच सहकाराचे ध्येय आहे" अशी आण्णांनी सहकाराची व्याख्या केली आहे.

<u>सहकाराचे ध्येय --</u>

आण्णा म्हणतात, पैसा हेच विनिमयाचे प्रमुख साधन असल्यामुळे पैशांमुळे गरिब, श्रीमंत असे दोन स्तर पडले. सामान्य माणूस राबराब राबू लागला. त्यांच्या श्रमातून निघालेली मलई खाणारा शोषणशाली श्रीमंत वर्गही उदयाला आला. परिणामी मुठभर लोकांच्या हातातच समाज जीवनाच्या नाड्या गेल्या. बहुजन समाजाचा कोंडमारा होऊ लागला. अशा सामान्य जनांना दिलासा देण्यासाठी सहकार पुढे आला. समाजातील दुर्बलांना स्वतःच्या पायावर उभे करण्यासाठी सहकार तत्वाची नितांत गरज आहे. त्यामुळे सामान्य माणसाच्या गरजा आणि इच्छा आकांक्षा यांच्या पूर्तीचे सुवर्ण माध्यम म्हणजे सहकार हे गरिब माणसांचे कल्याण हेच ध्येय सहकारापुढे असले पाहिजे. व्यक्ती स्वातंत्र्य अबाधित ठेऊन व्यक्तीची उन्नती साधता आली पाहिजे. व्यक्तीचा विकास म्हणजे साऱ्या देशाचा विकास हेच ध्येय सहकारापुढे असले पाहिजे."

<u>सहकाराचे घटक --</u>

मा. आण्णांच्या मते सहकाराचे खरे घटक म्हणजे ज्यांच्याकडे संपत्ती व पैशाचा अभाव आहे असे शेतकरी व कामगार होय. या घटकांसाठीच आण्णांनी आपले कार्यक्षेत्र मर्यादित केले.

व्यक्ती स्वातंत्र्य अबाधित ठेऊन व्यक्तीचा विकास करण्याच्या हेतूने सहकारी चळवळ उदयास आली. माणसा माणसातला फरक नाहीसा करुन एकत्र काम करण्याच्या विचारातून सहकार जन्माला आला. अशा या सहकार चळवळीमध्ये शेतकरी हा महत्वाचा घटक मानला गेला. त्यामुळे सहकारी चळवळीने कृषी औद्योगिक विकासासाठी तळागाळात पोहोचले पाहिजे. शेतकऱ्यांच्या कष्टकऱ्यांच्या संघटना बांधून त्यांच्यात विश्वास निर्माण करुन त्या योगेच समाज

सुधारणा घडवून आणता येते. आण्णांनी आधी केले मग सांगितले. सहकारातील महत्त्वाचे घटक म्हणजे सभासद व कामगार. कामगार हा औद्योगिक प्रक्रियेला मदत करणारा खरा घटक आहे. त्यामुळे त्याची आर्थिक सुधारणा होते की नाही व तो जीवनावश्यक गरजांची पूर्ती करण्यास समर्थ झाला आहे की नाही हे पहाणे अत्यंत गरजेचे आहे. [१५]

नाशिक जिल्हा सहकारी कार्यकर्त्यांच्या मेळाव्याच्या उद्घाटन प्रसंगी दे.म.रत्नाप्पा कुंभार यांनी केलेल्या मार्गदर्शनपर उद्बोधक भाषणात खालील विचार त्यांनी प्रकट केले आहेत --

<u>सहकारातील पथ्ये --</u>

' कोणत्याही सहकारी संस्थेचा विकास साधण्यासाठी सहकार चळवळीने काही पथ्ये पाळली पाहिजेत. एका विचाराने प्रेरित झालेल्या लोकांना विश्वासात घेऊन त्यांना संघटित करून सहकारी चळवळीला योग्य ती दिशा दिली पाहिजे आणि ती दिशा देण्याचे कार्य आण्णांनी चोखपणे बजावले. आण्णांच्या मते सहकारातील पहिले पथ्य म्हणजे प्रत्येक सहकारी संस्थेने तिला अनुरूप असलेल्या सर्व नियमांची काटेकोरपणे उपासना केली पाहिजे. सहकाराचे दुसरे पथ्य म्हणजे या सहकारी चळवळीतून गरिबांचा किती उद्धार होतो हे पाहिले पाहिजे.

सहकाराचे तिसरे पथ्य म्हणजे कोणत्याही धंद्यात व्यक्तीला स्थान न देता त्यात सामान्य माणसालाही स्थान मिळाले पाहिजे. तसेच त्याच्या समृध्दी बरोबरच त्याला मनानेही मोठा केला पाहिजे. ' बहुजन हिताय बहुजन सुखाय ' या उक्तीनुसार समाजाभिमुख दृष्टीकोण ठेवून संस्थेच्या उज्ज्वल भवितव्यास कारणीभूत ठरले पाहिजे. ' [१६]

कोल्हापूर जिल्ह्यातील आजरा या तालुक्याच्या ठिकाणी चालू असलेल्या दि आजरा अर्बन को.ऑप.बँकेच्या नव्या वास्तूच्या उद्घाटन प्रसंगी दे.म.रत्नाप्पा कुंभार यांनी खालील विचार मांडले ---

<u>सहकार - एक दुधारी शस्त्र --</u>

मा.आण्णा म्हणतात की ' सहकारी चळवळीत जशी आर्थिक प्रगती आहे तशी आर्थिक सत्ता देखील आहे म्हणूनच सहकारी संस्थामध्ये सत्तेचे विकेन्द्रिकरण

होणे गरजेचे आहे. परंतु आज देशात चालू असलेला सहकार हा समृध्द सहकार नाही तरी तेथे मक्तेदारी घुसलेली आहे. म्हणजेच सहकारात जोपासल्या गेलेल्या मक्तेदारीचे उच्चाटन करणे गरजेचे आहे. सहकार हा राष्ट्र उभारणीच्या कार्यात अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. आणि म्हणूनच माणसामध्ये स्वाभिमान निर्माण होईल अशा ' सजीव सहकाराची ' आपल्या देशाला आवश्यकता आहे.[१७]

नागपूर येथील धनंजयराव गाडगीळ सहकार प्रशिक्षण महाविद्यालयात ' सहकारी संस्थातील परस्पर संबंध ' या विषयावरील परिसंवादात दे.म.रत्नाप्पा कुंभारांनी खालील विचार मांडले --

सहकाराचा आधार - माणुसकी --

सहकार आणि मानवी जीवन यांचा संबंध म्हणजे एकाच नाण्यांच्या दोन बाजू आहेत. तेव्हा सहकार म्हणजे जीवन व जीवन म्हणजे सहकार असे म्हटले तर काय वावगे ठरणार नाही ' सहकार हा सहजीवनाचा आत्मा आहे व सहजीवन मानव जीवनाचा आत्मा आहे ' शुचिता, सद्भाव, सद्भिरुची याच्या त्रिवेणी संगमात सहकार जन्मास येतो. जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात त्याला त्या रुपाने सहकार येतोच, येथे सहकारात सामंजस्य असते. तेव्हा तो सहकार आनंदजनक असतो. सहकारात संघर्ष निर्माण झाल्यास तो दु:खदायक होतो. सहकार चळवळीचे खरे यश सहकारी क्षेत्रातील कार्यकर्त्यांनी ' सहकार एक जीवननिष्ठा आहे ' या भावनेतून काम केले पाहिजे ' असाही त्याचा आग्रह आहे.

सहकारातील समन्वय --

' सहकारी संस्थामध्ये आर्थिक विकास साधण्यासाठी कच्चा माल पुरवणारा मांडवलदार , कामगार व ग्राहक यांच्यामध्ये समन्वय साधण्याची आज नितांत गरज आहे. संस्थेच्या व्यवस्थापकांनी सभासदांशी, सामान्य जनतेशी अथवा बाह्य संस्थाशी सलोख्याचे संबंध ठेवायला हवेत. सभासदांच्या गाठीभेटी घेऊन त्यांच्या अडीअडचणी लक्षात घ्यायला हव्यात, संस्थेचे कामकाज, आर्थिक व्यवहार, ताळेबंद याबाबत चर्चा करुन नवीन सुधारणा, नवनियोजना अंमलात आणता येतात. त्यामुळे जिव्हाळ्याचे वातावरण निर्माण होते आणि विकासाला योग्य दिशा मिळते.[१८]

" सहकारी संस्थातील परस्पर संबंध " या विषयावर प्राचार्य श्री.य.द. देशपांडे व " सहकार " प्रशिक्षण केन्द्राचे प्राचार्य श्री.प्र.द.येरवडेकर यांनी दे.भ.रत्नाप्पा कुंभार यांची मुलाखत घेतली त्या मुलाखतीत श्री पंचगंगा सहकारी साखर कारखान्याच्या परिसरात झालेल्या विकासाच्या संदर्भात देशभक्त रत्नाप्पा कुंभार यांनी खालील विचार व्यक्त केले --

सहकारातील व्यवस्थापन --

" सहकारी संस्थाचे व्यवस्थापनही नीट असायला हवे. कोणत्याही एका व्यक्तिकडे सर्वेसर्वा अधिकार बहाल न करता सर्व व्यवस्थापन कमिटीनेच कामकाज पहावे. सर्वमुती निर्णय घ्यावा,खरेदी-विक्री संबंधात व्यवहार करत असताना संबंधित ठेकेदाराला कार्यालयात बोलावून सर्वांच्या देखत चर्चा करावी व निर्णय घ्यावा असे केल्याने भ्रष्टाचाराला थाराच राहाणार नाही.

आपणांनी औद्योगिक संबंध चांगले ठेवण्यासाठी कामगारांनाही सहकारी चळवळीत सामावून घेण्याची योजना राबविली आहे. पंचगंगा कारखान्यात कामगारांनाही सभासद करून कामगार सहकार्याचे पर्व उघडले आहे. त्यानी कामगारांच्या बाबतीत सौहार्दाचे संबंध ठेवून सरकारी नियमाप्रमाणे वेतन,सवलती, संस्थेचा लाभांश द्यावा त्यामुळे त्याची कार्यक्षमता वाढून संस्थेची अधिक प्रगती होईल.[१९]

रत्नागिरी जिल्हा सहकारी बोर्डाच्या परिषदेचे उद्घाटन करताना रत्नागिरी येथे दे.भ.रत्नाप्पा कुंभार यांनी कार्यकर्त्यांसमोर सहकारी फलोद्यानाबाबत खालील विचार मांडले --

सहकारी - फलोद्यान --

" सांगली व कोल्हापूर जिल्ह्यामध्ये ऊस पिकविणारा शेतकरी दिसून येतो. त्याच प्रमाणे रत्नागिरी जिल्ह्यामध्ये फळ पिकविणारा शेतकरी दिसून येतो. कोल्हापूरचा ऊसवाला व रत्नागिरीचा फळवाला असे समीकरण येत्या चार वर्षांत दिसले पाहिजे. सहकारी साखर कारखान्याच्या ऊस दरामध्ये चाळीस ते पन्नास रुपयांची तफावत शेतकऱ्याला जेव्हा दिसून आली,त्याचवेळी त्यानी

आपला ऊस सहकारी कारखान्याकडे देण्याचे ठरवले. सहकारामुळे निश्चित फायदा दिसून आला की, जनता सहकारामध्ये स्वतःहून पुढाकार घेते.यासाठी सहकारी संस्थांनी सेवे बरोबर नफ्याचाही विचार लक्षात घेतला पाहिजे. रत्नागिरी जिल्ह्याचा भौगोलिक विचार करता लहान लहान पाटबंधारे योजना हाती घेऊन या सहकारी संस्था कार्यक्षम करता येतील. रत्नागिरी जिल्ह्यात सहकारी फलोद्यान सोसायट्या स्थापन करून समाज विकास साधता येईल. या दृष्टीने जिल्ह्यातील कार्यक्षमसहकारी कार्यकर्त्यांनी विकासाचा आराखडा तयार करून तो कार्यान्वित केल्यास आपला जिल्हा वैभवशाली होण्यास वेळ लागणार नाही." [२०]

महाराष्ट्रात आज जिथे जिथे सहकाराचे वृक्ष फोफावले आहेत. तिथे तिथे आण्णांच्या विचाराचे खतपाणी लाभले आहे. आज आपणा सर्वांच्या जीवन विकासाचा एक राजमार्ग या दृष्टीने सहकाराचे महत्व किती मोठे आहे याचे आण्णांनी आपल्या शब्दात कथन केले आहे.

" माणसाने माणसा जवळ येणे हे प्रगतीचे द्योतक आहे. माणसा-माणसा-तील सद्भाव, सद्भिरुची, शुचिता याचे शिखर जसे उंचावते तशी माणसे परस्परांशी एकजीव होतात. माणसा-माणसांच्या या एकजीव होण्याच्या प्रक्रियेलाच मी सहकार असे समजतो. असा सहकार जेथे नांदतो तेथे गरिबांची गरीबी व श्रीमंतांची श्रीमंती कमी होत जाऊन एका समान भूमिकेवर येऊन ठेपते.येथेच सहकाराने सगळे जीवन उजळून निघते. संपूर्ण विकास मार्गाकडे सगळ्यांची पावले पडत असतात.माणसा माणसामधील " सहकार हाच येथे देव " बनतो. मग येथे माणसा माणसामधील वैर भावनेला वाव उरत नाही. लोभाला थारा मिळत नाही. अहंकार वाढत नाही, भ्रष्टाचाराला सहाय्य लाभत नाही. अशा ठिकाणी सर्व सहकारी पंढरीचे वारकरी, शुचिता आणि सद्भाव हेच त्याचे टाळ-मृदुंग " एकमेका सहाय्य करून अवघे धरू सुपंथ " हाच त्याचा अभंग .

अशा त-हेने सहकाराबाबतचे आण्णांचे विचार सर्वांना मार्गदर्शक ठरणारे आहेत.

## रत्नाप्पा कुंभारांनी स्थापन केलेल्या सहकारी संस्थांचा आढावा --

रत्नाप्पा कुंभार यांच्या कर्तृत्वाने, चैतन्यातून व त्यांच्या सहकारी वर्गा - कडून पंचगंगेच्या परिसरात अवतरलेली पहिली विकासाची व समृध्दतेची गंगोत्री म्हणजेच श्री पंचगंगा सहकारी साखर कारखाना होय. स्वातंत्र्यानंतरच्या काळात रत्नाप्पा कुंभार यांनी सहकाराचे कंकण बांधून अहोरात्र विधायक कार्याला वाहून घेतले. देशातील भयानक दारिद्र्य, अज्ञानाचा अंध:कार नष्ट करण्याच्या हेतूने स्वातंत्र्योत्तर नियोजनबध्द योजना आखल्या, त्यापैकी साखर कारखाना ही एक योजना होती.

### श्री पंचगंगा सहकारी साखर कारखाना लि., गंगानगर, इचलकरंजी --

आपल्या देशाचे नियोजन शेतीप्रधान, ग्रामीणाभिमुख व श्रमप्रधान असण्याची गरज आहे. ग्रामीण भाग हा देशाचा कणा आहे व शेती हा या देशाच्या अर्थ व्यवस्थेचा केन्द्रबिंदू आहे हे ओळखून रत्नाप्पाण्णांनी त्या दिशेने अखंड वाटचाल चालू ठेवली.

### श्री पंचगंगा सहकारी साखर कारखान्याची स्थापना --

या साखर कारखान्याची स्थापना रत्नाप्पा कुंभार व त्यांचे सहकारी कार्यकर्ते यांच्या प्रयत्नातून दि.१ ऑक्टोबर १९५५ रोजी झाली. या कारखान्यास भारत सरकार कडून १००० टन ऊस गाळण्याच्या कार्यशक्तीचा, कारखाना काढण्याचा परवाना मिळाला. या कामी यशवंतराव चव्हाण व बांधकाम मंत्री मालोजीराव नाईक यांचे सहाय्य लाभले.

### नोंदणी --

दिनांक १ जून १९५५ रोजी रत्नाप्पा कुंभार यांच्या अध्यक्षतेखाली प्रमुख कार्यकर्त्यांची सभा होऊन १५ दिवसात २ लाख रुपये शेअर्स भांडवल जमविण्याचा निर्धार केला. महिन्याभरात ३ लाख शेअर्स जमवले. प्राथमिक बैठकीत ६०० ते ८०० टनी कारखान्यासाठी रजिस्ट्रेशन योजना ( प्रपोजल ) पाठविण्याचा निर्णय झाला. दि.३१ ऑगस्ट १९५५ रोजी १००० टनी कारखान्याचे प्रपोजल पाठविण्यात आले. मुंबई राज्याच्या १९२५ च्या सहकारी कायद्याखाली रजिस्टर

नं.जी. २७२ ता. १-१०-१९५५ ने कारखाना रजिस्टर झाला.

पहिली साधारण सभा --

दिनांक २ जानेवारी १९५६ रोजी कारखान्याच्या सभासदांची कायद्याप्रमाणे पहिली साधारण सभा इचलकरंजी येथे आण्णांच्या अध्यक्षतेखाली झाली. ही सभा प्राचार्य धनंजयराव गाडगीळ व कर्मवीर भाऊराव पाटील यांचे मार्गदर्शनाखाली झाली. दि. २९ मार्च १९५६ रोजी कारखान्याच्या नावे दि बॉम्बे को.ऑप.बँक लि., मुंबई मध्ये कॉल डिपॉझिट म्हणून जमा करण्यात आली.एकूण २० लाख रु.जमले, त्यामुळे कारखान्याच्या कार्यात अधिक स्थैर्य प्राप्त झाले.

प्रारंभीचे कार्यक्षेत्र --

सुरुवातीचे कार्यक्षेत्र इचलकरंजीच्या आजूबाजूस १० मैल वर्तुळाचे होते. हातकणंगले तालुक्यातील ३०, शिरोळ तालुक्यातील ३३,कागल तालुक्यातील ३, करवीर तालुक्यातील २, चिकोडी तालुक्यातील १२ अशा ८० गांवाचा समावेश करण्यात आला. त्यात ऊसाचे क्षेत्र ७००० एकर होते.

कारखान्याचे पहिले संचालक मंडळ --

सभासदाकडून ११ व सहकारी अधिकारी,सहकारी बँका यांचे चार असे एकूण १५ संचालकाचे पहिले संचालक मंडळ मुंबई राज्याचे सहकारी खात्याचे रजिस्टार यांनी ता. २९ मार्च १९५६ रोजी जाहिर केले ते पुढील प्रमाणे --

| | | |
|---|---|---|
| १. | चेअरमन ,श्री रत्नाप्पा कुंभार - बी.ए., निमशिरगांव, | उत्पादक सभासद,प्रतिनिधि |
| २. | व्हा.चेअरमन,श्री मृगेंद्र विरुपाक्ष सुल्तानपुरे,इचलकरंजी बी.ए.,एलएल.बी. | -,,- -,,- |
| ३. | श्री विरुपाक्ष शिवाप्पा होईजड, पट्टणकोडोली | संचालक -,,-- |
| ४. | श्री आप्पासाहेब आण्णासाहेब पाटील, | ,, -,,-- |
| ५. | श्री दत्तात्रय आप्पाजी नाईक,-बी.ए.-इचलकरंजी | ,, -,,- |
| ६. | श्री देवाप्पा आप्पा मणेर, - कबनूर बी.ए.,एलएल.बी. | ,, -,,-- |
| ७. | श्री बापूसाहेब हिंदूराव पाटील , टाकवडे | ,, -,,- |
| ८. | श्री पासगोंडा तिडगोंडा पाटील, सदलगा | ,, -,,-- |
| ९. | श्री चिन्नाप्पा राजाप्पा गोते , रनकडी | संचालक सभासद |
| १०. | श्री दिनकरराव विठ्ठलराव मुद्राळे ,कुंभोज | सामान्य सभासद, व्यक्ती प्रतिनिधि |
| ११. | श्री आप्पासाहेब बाळासाहेब नाईक,हुपरी | सामान्य सभासद, सोसायटी समिती |
| १२. | श्री व्ही.पी.बर्वे | मॅनेजिंग डायरेक्टर, दि.बॉम्बे स्टेट को.ऑप.बॅंक लि.,मुंबई बॅंक प्रतिनिधि |
| १३. | श्री पी.डी.कसबेकर,आय.ए.एस.ऑफिसर ऑन स्पेशल ड्युटी,को.ऑप.शुगर - फॅक्टरी,पुणे, | रजिस्टर प्रतिनिधि |
| १४. | कलेक्टर ऑफ सोलापूर | सरकारी प्रतिनिधि |
| १५. | एक्झिक्युटिव्ह इंजिनियर | पी.डब्ल्यू.डी., कोल्हापूर |

कारखान्याच्या संचालक मंडळामध्ये विविध जाती-धर्माचे लोक आढळतात.

कारखान्याची जागा कबनूर येथील खाजगी जमिन मालक व त्याची स्थिलकुळे यांच्या सहकार्याने मिळवण्यात आली. सरकारच्या मालकीची १५ एकर २६ गुंठे जागा रु. ३,९८५ ला खरेदी करण्यात आली. सरकारी आणि खाजगी अशी एकूण जागा ९१ एकर प्राप्त करण्यात आली. ही जागा कारखान्याच्या

आजूबाजूच्या गावाना मध्यवर्ती असून शहापूर,कबनुर,तारदाळ,कोरोची व इचलकरंजी गावाच्या सिमेनजीक आहे. हातकणंगले रेल्वेस्टेशन कारखान्यापासून केवळ ३ मैलावर आहे. कारखान्याचा परिघ १० मैल आहे. श्री पंचगंगा सहकारी साखर कारखाना उभारणी करता सरकारी व बिनसरकारी अधिकारी,कार्यकर्ते, सभासद व अन्य नागरिकांचेही सहकार्य लाभले आहे.[२१]


स्था. क्र. ३.७ – श्री पंचगंगा सहकारी साखर कारखाना लि.,गंगानगर,इचलकरंजी –

| | साल | ऊस गाळप टन | ऊस गाळप टन टक्केमध्ये | साखर उत्पादन पोती | साखर उत्पादन पोती टक्केमध्ये | साखर उतारा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | १९५८–५९ | ४,८०४ | ०.९१ | ३,५३० | ०.०५ | ८ |
| २ | १९६३–६४ | १,९४,१९६ | ६.०० | २,३४,७०२ | ६.३६ | ११.८ |
| ३ | १९६८–६९ | ३,४९,७०४ | १०.८ | ४,२४,२०५ | ११.५० | ११.२ |
| ४ | १९७३–७४ | ३,८६,६५३ | १२.०० | ४,२६,२१८ | ११.५६ | ११ |
| ५ | १९७८–७९ | ८,३९,५९६ | २६.०० | ९,३३,९६० | २५.३४ | ११ |
| ६ | १९८३–८४ | ७,११,१७२ | २२.०० | ८,०९,७४६ | २१.९६ | ११.७ |
| ७ | १९८८–८९ | ७,४७,३८५ | २४.०४ | ८,५३,२५५ | २३.१४ | ११.६ |

१. १९५८–५९ सालच्या ऊस गाळपाच्या तुलनेत १९६३–६४ मध्ये ६ टक्के नी वाढ झालेली दिसून येते. तसेच १९६८–६९ साली १०.८ टक्के,तसेच १९७३–७४ साली १२ टक्के,१९७८–७९ साली २६ टक्के नी,१९८३–८४ मध्ये २२ टक्के, १९८८–८९ मध्ये २५ टक्के नी वाढ झाली.

वरील ३० वर्षाच्या काळामध्ये १९५८–५९ साली सर्वात कमी ऊस गाळप दिसून येते , तर १९७८–७९ साली सर्वात जास्त ऊस गाळप झालेले दिसून येते.

श्री पंचगंगा सहकारी साखर कारखाना
लि. गंगानगर, इचलकरंजी




आ. क्र 3.2

२. १९५८-५९ सालच्या साखर उत्पादनाच्या तुलनेत १९६३-६४ मध्ये ६.३६ नी वाढ झाली. १९६८-६९ साली ११.५० टक्के, १९७३-७४ साली ११.५६ टक्के, १९७८-७९ साली २५.३४ टक्के, १९८३-८४ साली २१.९६ टक्के, १९७८-७९ साली २३.१४ टक्के नी वाढ झाली.

वरील ३० वर्षांच्या काळामध्ये १९५८-५९ साली सर्वांत कमी साखर उत्पादन झालेले दिसून येते. तर १९७८-७९ साली सर्वांत जास्त साखर उत्पादन झालेले दिसून येते ( सा.क्र. ३.१ )[२२]

साखर कारखाना व समाज विकास --

रत्नाप्पा कुंभारांनी महात्मा गांधीचे स्वप्न प्रत्यक्ष कृतीत साकार करण्यासाठी आणि कृषी व औद्योगिक क्रांती बरोबर लोकशाही, समाजवादी समाज रचनेकडे अखंड वाटचाल करण्यासाठी श्री. पंचगंगा सहकारी साखर कारखान्याद्वारे कोल्हापूर जिल्ह्यात प्रथमच सहकाराची मुहूर्तमेढ रोवली. गेल्या ३२ वर्षांत आण्णांनी राष्ट्रीय पातळीवरील २० कलमी कार्यक्रमावर आधारित अनेक योजना व नवेनवे उपक्रम हाती घेऊन या जिल्ह्यातील गरीब लोकांचे जीवनमान उंचावण्यासाठी पराकोटीचे प्रयत्न केले. तळागाळातील लोकांना सुखी व समृध्द केले. महाराष्ट्रात श्री पंचगंगा कारखान्याने २० कलमी कार्यक्रमाबाबत विक्रमी कार्य केले आहे ते पुढीलप्रमाणे --

१) शेती विकास व शेती तंत्रज्ञान --

शेतीच्या विकासासाठी आण्णांनी अनेक भरीव योजना आखल्या त्यामध्ये ऊस संवर्धनासाठी शुध्द व निरोगी बेण्याचा पुरवठा, क्षार जमीन सुधारणा, ऊनसपीक संरक्षण, हिरवळीची पिके, बोअरिंग, ब्लास्टिंग, माती परीक्षण, ऊस चाचणी प्रयोग, ऊसपीक स्पर्धा, तागाचे बी पुरवणे, जमीन समपातळीवर आणणे व मागासवर्गीय जाती जमातीच्या विकासासाठी कारखान्याच्या शेती विभागाने शेती विकासावर अधिक लक्ष केन्द्रित करून अनेक योजना राबवल्या.

२) जमीन सुधारणा --

कृष्णा व पंचगंगा नद्यांच्या परिसरातील जमीनीचा पोत व क्षार जमीन सुधारण्यासाठी व कारखान्याच्या कार्यक्षेत्रातील सभासदांच्या शेतीतील मातीचे नमूने गोळा करुन ते तपासून त्यात खतांचा किती प्रमाणात वापर करावा याचे मार्गदर्शन कारखान्याकडून केले जाते.

३) उपसा जलसिंचन योजना --

पंचगंगा, कृष्णा, वारणा, दुधगंगा या नद्यांच्या परिसरात पूर्वी विहिरीवर नदीकाठी छोटे पंप बसवून जमिनीला पाणी दिले जात होते. त्या परिसरात आज मा. रत्नाप्पा कुंभारांच्या दुरगामी दृष्टीकोनातून व कुशल नेतृत्वाखाली या कारखान्याने कारखाना कार्यक्षेत्रात ५९ उपसा जल सिंचन योजना हाती घेतल्या आहेत. त्या पैकी आजपर्यन्त ४६ योजना पूर्ण झाल्या आहेत व १२ योजना वेगवेगळ्या स्तरावर व प्रगती पथावर आहेत. प्राथमिक अवस्थेतील सर्व्हे व प्लॅन एस्टीमेन्ट तयार करणे चालू असलेल्या योजना ३९ आहेत. त्याचप्रमाणे या भागात निमसिरगांव पाणी पुरवठा योजना ही देशातील एक सर्वांत मोठी योजना असून त्या परिसरातील सात गावाची दहा हजार एकर जमीन ओलिताखाली येणार आहे. ऊस पिकाबरोबर पाणी उपलब्ध व्हावे म्हणून या कारखान्याने सभासदां - साठी योजना आखली आहे. या योजनेद्वारे कूपनलिका व ब्लास्टींगसाठी अनुदान दिले आहे. महाराष्ट्रात अशी योजना पहिल्यांदा राबवणारा पंचगंगा कारखाना हा प्रथम क्रमांकाचा कारखाना आहे. कारखान्याच्या या भरीव योजनेमुळे ग्रामीण भागातील अनेक खेडेगावामध्ये पिण्याच्या पाण्याचे देखील दुर्भिक्ष्य कमी झाले आहे.

उपसा जलसिंचन योजना --

१ कार्यान्वित झालेल्या योजना --

अ) पंचगंगा नदीवरील योजना --

१) वसगडे २) पट्टणकोडोली ३) साजणी ४) यशवंत ५) रुई-कबनूर
६) हुपरी ७) इंगळी ८) चंदूर ९) अब्दुललाट १०) यड्राव ११) कुरुंदवाड पंचगंगा
१२) हेरले १३) तेरवाड १४) नांदणी क्र. १ व २ १५) शरणागती १६) सांगवडे
१७) अतिग्रे - चोकाक - रुकडी.

ब) कृष्णा नदीवरील योजना --

१८) उमळवाड १९) जयसिंगपूर २०) उदगाव क्र. २ २१) घालवाड क्र. २
२२) चिंचवाड २३) कनवाड हसूर २४) शिरटी क्र. १ २५) कवठेगुलंद -
शेडशाळ २६) औरवाड २७) औरवाड २८) कुरुंदवाड कृष्णा
२९) मजरेवाडी ३०) आलास ३१) अकिवाट बस्तवाड ३२) अकिवाड-राजापूर
३३) खिद्रापूर - राजापूर ३४) दानवाड ३५) टाकळी ३६) कोथळी
३७) चिंचवाड क्र. २(अर्जुनवाड) ३८) निमशिरगांव

क) वारणा नदीवरील योजना --

३९) कवठेसार ४० ) दानोळी क्र. १ ४१) दानोळी क्र. २

ड) दुधगंगा नदीवरील योजना --

४२) दत्तवाड क्र. १ ४३) दत्तवाड क्र. २)

२. चालू योजनांच्या सोईवाढीसाठी उर्वरित व जादा नळी पाटाच्या कामासाठी साखर विकास निधीतून अर्थ सहाय्य घेवून कामे चालू असलेल्या योजना ---

अ) पंचगंगा नदीवरील योजना --


१) सांगवडे २) हेरले ३) अतिग्रे चोकाक रुकडी ४) धरणगुत्ती, ५) यड्राव
६) नांदणी क्र. २ ७) रुई-यशवंत ८) तेरवाड .

ब) कृष्णा नदीवरील योजना --

९) आलास १०) घालवाड क्र. २) ११) औरवाड १२) खिद्रापूर-राजापूर
१३) टाकळी १४) निमशिरगाव.

क) वारणा नदीवरील योजना --

१५) दानोळी क्र. १ १६) दानोळी क्र. २, १७) कवठेसार.



आ.क्र. ३३

३. अ) प्रत्यक्षात कामकाजास सुरुवात होत असलेल्या योजना -- २

| अ.क्र. | योजनेचे नाव | नदी | एकर | अंदाजपत्रक रु.लाख |
|---|---|---|---|---|
| १ | तारदाळ | पंचगंगा | २,००० | २१४.८४ |
| २ | तिळवणी | पंचगंगा | ९६० | ७९.१९ |

४. मातीपरीक्षण प्रयोगशाळा --

कारखान्याच्या संशोधन व विकास विभागातर्गत माती परीक्षण प्रयोगशाळा सुरु केली असून प्रती वर्षी ४,००० मातीचे नमुने तपासले जातात. त्याचप्रमाणे शेतीसाठी वापरत असलेल्या विहिरीचे बोअरचे पाणीसुध्दा सभासदांना मोफत पृथःकरण करुन दिले जाते. रासायनिक खतांच्या शिफारशी माती परीक्षणावरुन दिल्या जातात.

५. वृक्षारोपण व सामाजिक वनीकरण --

राष्ट्रीय वृक्षारोपण व सामाजिक वनीकरणाचे महत्व लक्षात घेवून नारळ,आंबा,पेरु,चिक्कू,लिंबू,कडीपत्ती ही फळझाडे शेतकऱ्यांना अत्यंत माफक दरात देण्याची व सुबाभळीची रोपे मोफत पुरविण्याची योजना आखून कारखान्याने आतापर्यन्त ३० हजाराहून अधिक फळझाडे व पाच लाख सुबाभुळाची रोपे पुरवून महाराष्ट्रात क्रांती केली आहे.

६. इंधन व खत टंचाईसाठी गोबर गॅस --

देशासमोरील इंधन व खत टंचाईचा प्रश्न लक्षात घेऊन पंचगंगा कारखान्याने शेतकऱ्यांना उत्तम खत माफक किंमतीत उपलब्ध करुन देणे, स्वयंपाक, इंजिन, विजेचे दिवे यांची सोय करण्यासाठी कारखान्याच्या कार्यक्षेत्रात गोबर गॅस प्लॅंट बांधून पूर्ण करुन या कारखान्याने महाराष्ट्रामध्ये प्रथम क्रमांकाचा विक्रम ठेवला आहे.

७. <u>ग्रामोद्योग संकरीत गाय खरेदी व कृत्रिम गो पैदास योजना --</u>

शेतकऱ्यांना शेती बरोबरच जोडधन्दा उपलब्ध व्हावा म्हणून दुग्ध व्यवसायाचा जोडधन्दा आण्णांनी सुरु करुन दिला. कारखाना कार्यक्षेत्रात जास्तीत जास्त सुधारित गाईंची पैदास करणे, संकरित गायी खरेदी करणे, या साठी कारखान्यानी दि. २१ जून १९७७ ला एक अभिनव योजना सुरु केली तसेच पशु चिकित्सालयामार्फत दवाखान्याकडे येणाऱ्या जनावरांची तपासणी, जनावरांना औषधोपचार, गर्भ तपासणी, इ. पशु वैद्यकिय सेवा उपलब्ध करुन दिल्या. तसेच जनावरांना लाळ प्रतिबंधक लस टोचण्याची सोय केली.

८. <u>सुशिक्षित बेकार व दुर्बल शेतकरी योजना --</u>

सभासद, सुशिक्षित बेकार व दुर्बल शेतकऱ्यांना रोजगार उपलब्ध करुन देण्यासाठी आण्णांनी कारखान्याकडून बॅन्केमार्फत सुलभ हप्त्याने ट्रक, ट्रॅक्टर, बैलगाडया पुरवल्या आहेत. तसेच बैलजोडया खरेदी करुन दिल्या.

९. <u>ग्रामीण विकास रस्ते व पिण्याचे नळपाणी योजना --</u>

ग्रामीण भागातील रस्ते हा एक अत्यंत ज्वलंत प्रश्न असून पंचगंगा कारखान्याने ऊस व इतर शेतीमाल बाजारापर्यन्त पोहोच करण्यासाठी नवीन रस्ते बांधणी, दुरुस्ती पाणंद रस्त्याचा कार्यक्रम , हा ग्रामीण भागाच्या विकासातील एक अत्यंत महत्वाचा टप्पा आण्णांनी मांडलेला आहे. जेथे ज्या ज्या गावांना शक्य आहे तेथे त्या गावांना पिण्याच्या नळपाण्याची सोय करुन दिली आहे.

१०. <u>कुटुंब नियोजन व नेत्रदान शिबिर --</u>

ही राष्ट्रिय चळवळ आहे हे लक्षात घेऊन आण्णांनी कारखान्यामार्फत अनेक कुटुंब नियोजन, शस्त्रक्रिया, शिबिरे व नेत्रदान शिबिर इ. घेतली आहेत. तसेच कार्य स्थळावर स्वतंत्र दवाखाना स्थापन करुन कामगार, सभासद व त्यांच्या नातेवाईकांना वैद्यकिय सेवा पुरवली जाते.

११. भूमिहिन शेतमजूरांसाठी जागा व घरकुले बांधण्याची योजना --

शेत मजूरांना घरकुले बांधून देण्यासाठी व जागा देण्यासाठी पंचगंगा कारखाना महाराष्ट्रात अग्रेसर आहे. या कारखान्याने २५ लाख रु.खर्च करुन महाराष्ट्रात एक नवा उपक्रम प्रस्थापित केला आहे.

१२. शैक्षणिक ,सामाजिक व सांस्कृतिक विकास योजना --

ग्रामीण भागातील अज्ञानाचा अंध:कार नाहीसा व्हावा,खेड्यातील लोकांचा सामाजिक व सांस्कृतिक विकास साधावा यासाठी रत्नाप्पा कुंभार यांनी पंचगंगा कारखान्याच्या साहाय्याने प्रथमपासून अनेक अव्वल दर्जाच्या भरीव योजना हाती घेतल्या आहेत. यामध्ये प्राथमिक व माध्यमिक शाळा, वाचनालये,तालिम ईमारती,समाज मंदिरे, सहकार मंदिर, हरिजन मंदिरे, ग्रामपंचायती,युवक संघटना, महिला मंडळे,भजनीमंडळे, पैलवान, शाहिर,कलावंत, अपंग, बहिरे, मुके, खेळ व क्रीडा यांना प्रोत्साहन व मदत,गुणवत्ता,शिष्यवृत्या व वैद्यकिय आणि कृषि विद्यार्थ्यांना बिनव्याजी कर्ज देणे यावर कारखान्याने खर्च करुन सामाजिक बांधिलकी प्रस्थापित करुन दाखविली आहे.

१३. महिला व बाल कल्याण --

ग्रामीण भागातील महिला जागृत व सुसंस्कृत राहाव्यात म्हणून कारखाना परिसरातील प्रत्येक गावात महिला मंडळ स्थापन व्हावेत व त्यांना शिवण यन्त्रे आदि साहित्य देवून घर बसल्या उद्योग करता यावा यासाठी अनुदान देण्याची योजना कारखान्याने सुरु केली.

१४. अपंग-मुके बहिरे व स्वातंत्र्य सैनिक यांना प्रशिक्षण सवलती व अर्थ साहाय्य --

रत्नाप्पा कुंभारांनी शिबिरे आयोजित करुन मुक्या,बहिऱ्या मुलांना प्रशिक्षण दिले. तसेच अर्थसाहाय्य व सवलती मिळवून देऊन त्यांच्यासाठी विशेष प्रयत्न केले.

१५. ६ ते १४ वयोगटातील मुलांना सक्तीचे प्राथमिक शिक्षण व प्रौढ साक्षर योजना --

ग्रामीण भागातील, खेड्यापाड्यातील गरीब, मुला-मुलींना प्राथमिक शिक्षण मिळावे म्हणून व अडाणी प्रौढ लोकांमध्ये साक्षरतेचे प्रमाण वाढावे यासाठी आण्णांनी पंचगंगा कारखान्यामार्फत प्रयत्नांची पराकाष्ठा केली.

१६. राष्ट्रीय आपत्ती --

दुष्काळ, भूकंप, महापूर, जलिग्रस्त अशा मार्गांनी जेव्हा जेव्हा राष्ट्रावर अचानक संकट कोसळले तेव्हा कारखान्यामार्फत मदत करण्यासाठी रत्नाप्पा कुंभार नेहमी आघाडीवर असतात. तसेच नैसर्गिक आपद्ग्रस्तांना कारखान्याकडून सहाय्य, त्यांना राहाण्यासाठी निवारा म्हणून तट्टे, बांबू इ. साहित्य पुरवले जाते. तसेच कपडे, भांडी, पांघरुण इ.ची मदत कारखान्यामार्फत दिली जाते.

१७. आरोग्य, वैद्यकीय सुविधा, दवाखाना औषधोपचार --

आण्णांनी आपल्या कामगारांना त्यांच्या कुटुंबियांना आणि कार्य - क्षेत्रातील सभासदांना वैद्यकीय सुखसोई, सवलती, उपलब्ध करुन दिल्या आहेत. स्वतंत्र दवाखाना, तज्ञ वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या नेमणूका करण्यात आल्या आहेत. या वैद्यकीय सवलतीचा लाभ दररोज ३०० रुग्ण घेत असतात.

१८. मागासवर्गीय व हरिजन अनुसूचित जाती जमातीचा उध्दार योजना --

हरिजनांच्या जमिनीवर पाणी पुरवठा करणे, हरिजन अल्प-भुधारक शेतकऱ्यांना ऊस लावणीकरिता अनुदान देणे, हरिजनांना घरे बांधून देणे व जागा उपलब्ध करुन देणे, हरिजन समाज मंदिरे बांधून देणे, हरिजन विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत करणे, नोकरीत प्राधान्य देणे, पिण्याच्या पाण्याची सोय करणे, कारखाना संचालक बोर्डावर हरिजन संचालक नेमणे, जेथे पाणी पुरवठा योजना शक्य नाही तेथील हरिजनांच्या जमिनीत सामुदायिक विहिरी काढून देण्यात आलेल्या आहेत.[२३]

## दि पिपल्स को.ऑपरेटिव्ह बॅन्क लि., इचलकरंजी, जिल्हा - कोल्हापूर

### स्थापना व प्रगती--

इचलकरंजी नगरीतील वस्त्रोद्योग तसेच या उद्योगाच्या अनुषंगाने सामान्य व गरिब लोकांचे छोट्या मोठ्या उद्योगात अर्थ सहाय्य करून व वाढीस लावण्या-साठी व उद्योगावर अवलंबून असणाऱ्या सर्व लोकांचे जीवनमान उंचावण्यासाठी रत्नाप्पा कुंभार यांचे प्रेरणेने व नेतृत्वाने दि पिपल्स को.ऑप.बॅन्केची स्थापना दिनांक २१ डिसेंबर १९६२ मध्ये झाली. संचालक मंडळाची पहिली सभा दिनांक ४ जानेवारी १९६३ रोजी झाली. या सभेत रत्नाप्पा कुंभार यांची बॅन्केचे चेअरमन म्हणून निवड करण्यात आली.

### प्रगतीची वाटचाल --

सुरुवातीच्या दीड वर्षाच्या कालावधीत संस्थेचे कामकाज हे बाल्यावस्थेमध्ये असले तरी तारीख २३ मे १९६४ रोजी श्री पंचगंगा सहकारी साखर कारखान्याच्या परिसरात गंगानगर शाखेची स्थापना करण्यात आल्याने बॅन्केच्या कार्याची गती वाढली व सभासद संख्येतही चांगली भर पडली. या बॅन्केच्या गंगानगर शाखेच्या स्थापनेमुळे कारखान्याचे ऊस उत्पादक सभासद, बिगर सभासद, कारखान्याचा कामगार वर्ग तसेच सामान्य गरिब जनतेला त्याचे विविध आर्थिक प्रश्न सोडविण्यासाठी एक चांगले साधन प्राप्त झाले. साखर कारखान्यास ऊस उत्पादक पुरवठा करणाऱ्या शेतकरी बांधवाना त्यामुळे ठेव ठेवण्यासाठी बॅन्केने आवाहन केले. त्या आवाहानास योग्य प्रतिसाद सभासदांनी दिल्याने बॅन्केच्या ठेवीमध्ये वाढ होऊन लागली, त्यामुळे बॅन्केच्या कामाची व्याप्ती वाढली. तसेच या ठेवी वाढल्याने इचलकरंजी शहरातील छोटे यंत्रमागधारक, कारखानदार, लहान व्यापारी, सामान्य कारागीर याना ५-१२ लाख रक्कमेची कर्जे देऊन त्यांच्या विविध गरजा भागविण्यात आल्याने सर्वसामान्य व गरजू लोकांमध्ये बॅन्के विषयी आस्था वाढली. ठेवीदारामध्ये बॅन्केबद्दल विश्वास निर्माण झाला. बॅन्केचे कामकाज गतीमान होऊन लागले.

बॅन्केला स्वत:ची जागा व इमारत असावी अशाप्रकारच्या सूचना सभासदांकडून केल्या गेल्याने दिनांक १० ऑक्टोबर १९६९ रोजी बॅन्केच्या ईमारतीसाठी जागा खरेदी करण्यात आली. तसेच सभासदांनी दरवर्षीच्या आपल्या लाभांशाची रक्कम ईमारत फंडामध्ये जमा करणे विषयी एकमताने मंजूरी दिल्याने दिनांक ७ मे १९७३ रोजी बॅन्केच्या ईमारतीचा पायाभरणी समारंभ मा.सत्यवादीकार पद्मश्री बाळासाहेब पाटील यांचे हस्ते करण्यात आला. पुढे दिनांक २१ एप्रिल १९७७ रोजी अक्षय तृतीयेच्या शुभ मुहूर्तावर बॅन्केचे मुख्य कार्यालय स्वत:च्या चार मजली ईमारतीत सुरु झाले.[२४]

बॅन्केच्या सभासद संख्या ३० जून १९९० अखेर १२,५९४ इतकी झालेली आहे. बॅन्केचे स्थैर्य व कामाची वृध्दी ही ठेवीवर अवलंबून असते.३० जून १९९० अखेर बॅन्केकडील एकूण ठेवी रु.६,७३,९८,६००- इतक्या आहेत.[२५] त्याचा तपशील पुढीलप्रमाणे-

| अ.नं. | तपशिल | १९६३ | १९७३ | १९८३ | १९९० |
|---|---|---|---|---|---|
| १ | सभासद संख्या | १,७१७ | ५,५२५ | १०,०४१ | १२,५९४ |
| २ | वसुल भाग भांडवल | ०.५० | ४.१६ | १३.४२ | २७.६८ |
| ३ | गंगाजळी व इतर निधि | ०.०२ | ५.२१ | ३४.४८ | ७२.०५ |
| ४ | स्व भांडवल | ०.५२ | ९.१८ | ४७.९० | ९९.७३ |
| ५ | ठेवी | ०.८६ | १३१.३९ | ३७२.६४ | ६७३.९८ |
| ६ | कर्जे | ७.५३ | ८३.९५ | २६०.८८ | ५४३.६३ |
| ७ | निव्वळ नफा | -- | २.६३ | ४.२८ | ९.२८ |
| ८ | खेळते भांडवल | १.३६ | १६०.२३ | ४४६.८३ | ८८३.७० |
| ९ | लांभाश दर | -- | ६ | १२ | १२ |
| १० | सेवक वर्ग | ६ | ५१ | ९६ | ११२ |

सा क्र 3·2

सभासदांच्या सर्वांगीण उन्नतीचे बॅन्केचे कर्ज वितरणाचे धोरण, समाजाच्या सर्व थरातील विविध व्यवसायातील कष्टकरी, कामकरी, कारागीर, शेतकरी, यापासून ते छोट्या मोठ्या उद्योग धंद्यातील व्यापारी वर्गापर्यन्त राबवून त्यांचा आर्थिक विकास घडविण्यास बॅन्क अग्रेसर राहिलेली आहे.

बॅन्केच्या संचालक मंडळामध्ये सहकारी कायद्यातील तरतुदीनुसार दिनांक ३ फेब्रुवारी १९८१ रोजी अनुसूचित जाती व जमाती अगर राज्य सरकारने जाहिर केलेल्या विमुक्त जाती पैकी एक व आर्थिकदृष्ट्या दुर्बल सभासदांपैकी एक अशा दोन राखीव संचालकांचा समावेश झाला. व बॅन्क कर्मचारी प्रतिनिधिचीही एक जागा भरणेत आली त्यामुळे बॅन्केच्या सेवक वर्गाची संख्या ७९ पर्यन्त वाढली. शासनाच्या आदेशास अनुसरुन सेवकामध्ये ३३ राखीव मागासवर्गीय सेवकांची भरती केली. त्यामुळे शासनाने ठरवून दिलेले मागासवर्गीय सेवकांचे प्रमाण ३४ टक्के पेक्षा जास्त झाले. बॅन्केचे काम अधिक तत्परतेने व सुसूत्रपणे होऊन लागले. बॅन्केकडील विविध ठेवी योजनामुळे ठेवीदारांना त्यांच्या सोईप्रमाणे ठेवी ठेवून बचत करणे सुलभ झाले. ठेवीदारांचा विश्वास वृद्धिंगत झाला. ठेवींच्या वाढीने समाजातील गरजू लोकांची आर्थिक कामे मोठ्या प्रमाणात करणे बॅन्केस शक्य झाले, आहे. बॅन्केचे सुरुवातीपासूनचे कर्ज वितरणाचे धोरण समाजाचे सर्व स्थरात समर्थपणे राबवणे सहज शक्य झाले.[२६]

बॅन्केच्या स्थापनेपासून बॅन्केच्या प्रगतीमध्ये रत्नाप्पाण्णा कुंभार यांचे नेतृत्व सलगपणे व सातत्याने बॅन्केस लाभत आहे. संस्थापक व संचालक या नात्याने त्यांचे मार्गदर्शन बॅन्केला अखंडीतपणे मिळत आहे. त्यामुळे बॅन्क स्थापनेपासून संचालक मंडळाच्या निवडणूका या बिनविरोधच झालेल्या आहेत. रत्नाप्पा कुंभार यांची प्रेरणा व मार्गदर्शन घेऊन बॅन्केने उत्कर्षाची गती कायम ठेवली आहे.

३) <u>कोल्हापूर जनता सेंट्रल को.ऑप.कंन्झुमर्स स्टोअर्स लि., कोल्हापूर -</u>

सहकारी समाजवादाच्या दिशेने वाटचाल करीत असलेल्या आपल्या देशात नागरिकांच्या सुखसोईसाठी व जनतेस लागणाऱ्या दैनंदिन गरजेच्या जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा वाजवी दरात व्हावा या हेतूने मध्यवर्ती सरकारने सहकारी ग्राहक

भांडारे देशभर सुरु करण्याची योजना आखली. भारतावर १९६१ मध्ये चीन ने आक्रमण केल्याने युध्दजन्य परिस्थिती निर्माण झालेली होती. त्यामुळे जीवनोपयोगी वस्तूंच्या किंमती भरमसाठ वाढलेल्या होत्या. वेळोवेळी निर्माण झालेल्या नैसर्गिक अगर कृत्रिम टंचाईच्या काळात सर्वसामान्य ग्राहकाला जीवनोपयोगी गरजेच्या चांगल्यावस्तू मापक किंमतीत मिळणे शक्य व्हावे, साठेबाजी - मुळे भरमसाठ नफेबाजीस आळा बसावा या उद्देशाने ग्राहक चळवळीला सरकारच्या योजनेनुसार रत्नाप्पा कुंभारांनी उत्तेजन दिले. केवळ नफ्याची दृष्टी आण्णांनी न ठेवता कमीत कमी मोबदल्यावर वस्तू अधिकाधिक स्वस्त देण्याचा आण्णांनी विचार केला असून त्याचा फायदा सभासदांना मोठ्या प्रमाणात मिळावा या ध्येयाने ग्राहक भांडारे उघडण्याचा मानस रत्नाप्पा कुंभारांनी केला.

जनता बझारची स्थापना --

राज्य सरकारच्या मार्गदर्शनाखाली जनता बझार ही संस्था दिनांक २४ जानेवारी १९६३ रोजी स्थापन झाली. या संस्थेच्या पहिल्या दुकानाचे उद्घाटन महाराष्ट्र राज्याचे नागरी पुरवठा मंत्री नामदार तत्यारखान यांच्या हस्ते दिनांक १७ फेब्रुवारी १९६३ रोजी होऊन संस्थेच्या कार्यास प्रारंभ झाला.[२७]

संस्थेचे पहिले संचालक मंडळ --

१ श्री शंकरराव दत्तात्रय माने - चेअरमन,
मा. अध्यक्ष कोल्हापूर जिल्हा - कॉंग्रेस कमिटी.

२ श्री पारीसाप्पा भरमाप्पा इंग्रोळे - व्हा. चेअरमन
चेअरमन, हातकणंगले. ता. स. ख. वि. संघ. लि.,

३ श्री रत्नाप्पा भरमाप्पा कुंभार - सभासद
चेअरमन, श्री. पंचगंगा सहकारी साखर कारखाना लि.,
डायरेक्टर, नॅशनल फेडरेशन ऑफ को. ऑप. शुगर फॅक्टरीज, दिल्ली.

४ श्री शंकरराव आप्पाजी पाटील - चंदूरकर - सभासद
जिल्हा परिषद, सभासद. व्हा. प्रेसि. विरशैव को. ऑप. बॅन्क लि., कोल्हापूर,

५ श्री बापूसाहेब भाऊसाहेब पोवार - सभासद
म्युन्सिपल कौन्सिल.

६ श्री विश्वासराव भाऊराव पाटील - सभासद
डायरेक्टर, महाराष्ट्र राज्य होलसेल कंझ्युमर्स स्टोअर्स फेडरेशन, मुंबई.

७ श्री आपूसाहेब कृष्णाराव घाडगे - सभासद
माजी प्रेसिडेंट बलभीम को.ऑप.बँक लि., कोल्हापूर

८ श्री पांडुरंग दत्तात्रय येवले - सेक्रेटरी.

जनता बाझार विकास व विस्तार --

जनता बझार सुरु झाल्यापासून रत्नाप्पा कुंभारांनी आपल्या अधिकार क्षेत्रात बरीच खाती सुरु केली. १९६३ मध्ये १० शाखा सुरु झाल्या. सात फिरते बझार, एक मशिन शॉप, सात कापड दुकान, एक स्वस्त धान्य दुकान सुरु झाले. १९७५-७६ मध्ये जनता बझारच्या सर्व प्रकारच्या शाखेची वाढ १० वरुन ४६ वर गेली. १९७६ नंतर मात्र या शाखांची संख्या घटली. १९८१-८२ मध्ये ती ३६ वर गेली याचे कारण अकार्यक्षमता, दुर्लक्षितपणा आणि योग्य योजनांचा अभाव होय. १९८६-८७ मध्ये शाखांची संख्या ३५ झाली. त्यामध्ये फिरत्या बझारचा क्रमांक वर लागतो. या काळामध्ये १६ फिरते बझार, ८ विभागीय स्टोअर्स, ४ स्वस्त धान्य दुकान सुरु झाले. कमीत कमी दरात सर्व वस्तु ग्राहकांना पुरविण्याचे काम हे भांडार करीत आहे. या भांडारामार्फत खालील शाखा उघडल्या आहेत --

जनता बझारच्या शाखा व विभाग खालीलप्रमाणे ---

| | | | |
|---|---|---|---|
| १ | हेड ऑफिस | - | १५१७ सी, लक्ष्मीपुरी, कोल्हापूर |
| २ | होलसेल गोडाऊन | - | -,,- |
| ३ | बेकरी विभाग | - | -,,- |
| ४ | नवरत्न कागद केंद्र | - | -,,- |
| ५ | जनता बझार, वरुणतीर्थ | - | २४०९, ए वॉर्ड, शिवाजीपेठ, कोल्हापूर |

६ जनता बझार, रुईकर कॉलनी - रुईकर कॉलनी,कोल्हापूर

७ -,,-- राजारामपुरी - १२१६,ई,राजारामपूरी,कोल्हापूर

८ -,,-- रविवार पेठ - ८५२।२ रुईया विद्यालयाचे मागे, कोल्हापूर

९ -,,-- रत्नाप्पा कुंभारनगर -५१९,रत्नाप्पा कुंभारनगर,पांचगांव,कोल्हापूर

१० -,,-- लक्ष्मीपूरी - १५१७ सी,लक्ष्मीपूरी,कोल्हापूर

११ -,,-- पन्हाळा - जिजामाता विश्रामगृह,पन्हाळा

१२ --,,-- पुणे - २७।२ सोमवारपेठ,पुणे-११

१३ फिरता जनता बझार

१४ जनता बझार,नाळे कॉलेजनी,नाळे कॉलनी,कोल्हापूर

१५ स्वस्त धान्य दुकान,शाखा नं.१-१५१७ ,सी,लक्ष्मीपूरी,कोल्हापूर

१६ --,,-- नं.२ -५२९।३० ई,शाहुपूरी,कोल्हापूर

१७ --,,-- ३- ८१९,ए,पिनरंगाई तालीम जवळ,कोल्हापूर

१८ -,,-- ४-८५२।२,ई,रुईया विद्यालयामागे,कोल्हापूर

१९ --,,-- ५-२९९,ई,बेकर गल्ली,न्यू शाहुपूरी,-,,--

२० --,,-- ६-१८४४,ई,राजारामपुरी, ६वी गल्ली,-,,-

२१ --,,-- ७-रुईकर वसाहत,कोल्हापूर

२२ --,,-- ८-१४५६,ए,शिवाजीपेठ,कोल्हापूर

२३ --,,-- ९-शाहुनगर,वड्डवाडी,कोल्हापूर

२४ --,,-- नं.१०-गायकवाड्याजवळ,कपिलतीर्थ मार्केट,कोल्हापूर

२५ --,,-- नं.१२-२६७१,बी,मंगळवारपेठ,कोल्हापूर

२६ --,,-- नं.१३-१९७५,डी,शनिवारपेठ,कोल्हापूर

२७ --,,-- नं.१४-५०७,ई,गोकुळ हॉटेल पिछाडीस,शाहुपूरी,को.

२८ --,,-- नं.१५-नाळे कॉलनी,कोल्हापूर

२९ --,,-- नं.१६-रत्नाप्पा कुंभार नगर,पाचगांव,कोल्हापूर

३० --,,-- नं.१७-महादेव नगर,कोल्हापूर

३१ होलसेल कापड विभाग-१२१६,ई,राजारामपूरी,कोल्हापूर

३२ कापड व सागर विभाग - कळे - मु.पो.कळे,ता.पन्हाळा, जिल्हा कोल्हापूर

३३ जनता वही कारखाना - चित्रदुर्ग मठ, दसरा चौक, कोल्हापूर

३४ स्पिरीट विभाग - प्रतिभानगर, म्यु. शाळा नं. ३, ई, कोल्हापूर

३५ होजिअरी विभाग - १२१६, ई, राजारामपूरी, कोल्हापूर

३६ होलसेल रॉकेल व क्रूड ऑईल विभाग - १५१७, सी, लक्ष्मीपूरी, कोल्हापूर. [२८]

१९८७-८८ मध्ये ग्रामीण भागातही जनता बझारची सुरुवात झाली. वरील सर्व विस्तारीत शाखावरुन असे दिसून येते की दिवसे दिवस हे स्टोअर गि-हाईकांना अधिकाधिक सुखसोई देऊ लागले आहे.

१) कार्याची व्याप्ती --

ठराविक भागामध्ये जनता बझारच्या शाखा विस्तारीत झाल्या आहेत. विशेषात: करवीर तालुक्यात या शाखा कार्यरत आहेत. इतर कोल्हापूर जिल्हातील तालुक्यामध्ये नवीन शाखा कार्यपध्दतीला प्राधान्य दिले गेले आहे.

२) सभासद --

सभासदामध्ये वाढ होणे हे सहकारी संस्थाच्या दृष्टीकोनातून महत्वाचे आहे. या संस्थेमध्ये खुल्या सभासदांची सोय केली आहे. महाराष्ट्र सहकारी कायद्याप्रमाणे कोणतीही सहकारी संस्था योग्य कारणाशिवाय सभासदत्व नाकारु शकत नाही. यालाच खुल्या सभासदत्वाचे तत्व म्हणतात. १९८९-९० साली अहवालानुसार सभासद संख्या १७,३८३ इतकी आहे.

सा. क्र. ३.३ <u>कोल्हापूर जनता सेंट्रल को. ऑप. कंझ्युमर्स स्टोअर्स लि., कोल्हापूर</u>

| अ.नं. | साल | सभासद | सभासद संख्या | विक्री(लाखात) | विक्री टक्के |
|---|---|---|---|---|---|
| १ | १९७१ | ४,०३७ | ३.७९ | ९७.६३ | २.०० |
| २ | १९७३ | ४,२३६ | ३.९८ | १४४.२९ | २.९५ |
| ३ | १९७५ | ५,२८२ | ४.९६ | २४१.४३ | ४.९४ |
| ४ | १९७७ | ९,६७१ | ९.०९ | २४०.६१ | ४.९४ |
| ५ | १९७९ | ९,६८१ | ९.१० | १५६.६५ | ३.२१ |
| ६ | १९८१ | १२,०५६ | ११.३३ | ३८८.९६ | ७.९७ |
| ७ | १९८३ | १२,७२७ | ११.९७ | ५०२.११ | १०.२९ |
| ८ | १९८५ | १४,२८६ | १३.४३ | ७८२.१४ | १६.०३ |
| ९ | १९८७ | १६,९५६ | १५.९४ | १,०७०.०७ | २१.९३ |
| १० | १९८९-९० | १७,३८३ | १६.३५ | १,२५५.११ | २५.७२ |


१९७१ मध्ये सभासद संख्या ४,०३७ होती ती १९८९ मध्ये १७,३८३ झाली. गेल्या १८ वर्षांमध्ये १२.५६ टक्के नी वाढ झालेली दिसून येते. त्याच प्रमाणे १९७१ मध्ये विक्री ९७.६३ लाख होती ती १९८९ मध्ये १२५५.११ लाख झाली असून गेल्या १८ वर्षांमध्ये यामध्ये २३.७२ टक्के नी वाढ झालेली दिसून येते.

५) <u>भागभांडवल</u> --

अत्यल्प भांडवलात स्टोअर्सचे कामकाज सुरू झाले. जसजसा स्टोअर्सचा विस्तार होत गेला तसतसे अधिक निधीची आवश्यकता लाभली. भागभांडवल वाढविण्यासाठी स्टोअरने सरकारी निबंधकाकडून एकूण भांडवलाची मर्यादा वाढवून घेतली. १९६४-६५ पर्यन्त राज्य सरकारकडून आर्थिक मदत मिळत नव्हती. त्यामुळे ग्राहक संस्थेला स्वतःच्या भागभांडवलावर अवलंबून राहावे लागत होते. चौथ्या पंचवार्षिक योजनेत केन्द्र सरकार मधील राष्ट्रीय सहकारी ग्राहक भांडार संस्थेने


कोल्हापूर जनता सेंट्रल को. ऑप. कन्झ्युमर्स स्टोअर्स लि.

(सभासद संख्या)




आ. क्र. ३.४

कोल्हापूर जनता सेंट्रल को ऑप.
कंझ्युमर्स स्टोअर्स लि.
(विक्री कोटी रु.) प्रमाण :-
१ से.मी = १ कोटी रुपये




आ.क्र. ३५

ग्राहक भांडारांना व्यापारी घटक वाढविण्यास मदत केली. केन्द्रीय ग्राहक भांडार सोसायट्यांना राज्य सरकारने स्वस्त दरातील विभागीय ग्राहक भांडवल उभारण्यास मदत केली. याचा परिणाम म्हणून एकूण भागभांडवलामध्ये राज्य सरकारचे भागभांडवल वाढले. ग्राहक भांडाराची आर्थिक बाजू मजबूत करण्यासाठी राज्याची भागीदारी आवश्यक आहे. तरीसुध्दा ग्राहक भांडारांना स्वतःचा निधी वाढवून दिला पाहिजे हे दाखवून दिले. या संस्थेचे १९८९-९० साली एकूण भाग भांडवल ६२,७०,३०८ इतके आहे.

वापरातील भागभांडवल --

वापरातील भागभांडवलामध्ये राखून ठेवलेला निधी,परत नाव्याचे भाग - भांडवल ,सूट, कर्ज,इ.चा समावेश होतो. ग्राहक भांडाराचे कार्य वाढविण्यासाठी हे भांडवल उपयोगी पडते. ग्राहक भांडवलाच्या स्थापनेपासून या भांडवलात वाढ होत गेलेली आहे. ही वाढ त्या भांडाराची आर्थिक स्थिती दर्शविते. वापरात येणाऱ्या भांडवलाबरोबर भाग भांडवल सुध्दा वाढले पाहिजे.

जनता बझारासाठीचे अर्थ सहाय्य --

या ग्राहक भांडारात राज्य सरकार कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅन्क आणि जिल्हा सहकारी बॅन्क इ.मार्फत कर्ज पुरवठा केला जातो. या बॅन्का तारण व विनातारण दोन्ही प्रकारची कर्जे भांडाराला देतात. ग्राहक भांडाराने स्वयंसेवा, आधुनिक पध्दत सुरु केली ( १९८०-८१ ) त्यासाठी अधिक निधीची गरज भासली याचा परिणाम म्हणून कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती बॅन्केकडून अधिक कर्ज घ्यावे लागले. [१९]

भांडाराचे एकूण मिळकत व खर्च --

जनता बझारच्या शाखामुळे सर्व सामान्य ग्राहकांना सर्व जीवनावश्यक वस्तू स्वस्त भावामध्ये मिळू लागल्या. वस्तूंची अचानक कृत्रिम टंचाई करुन ग्राहकांची गळचेपी करणाऱ्या व्यापाऱ्यांच्या अनिष्ट प्रवृत्तीला आळा बसला. तसेच डिपार्टमेन्ट

स्टोअर्समुळे ग्राहकांना योग्य वजनाचा, योग्य किंमतीचा दर्जेदार माल मनपसंतीने खरेदी करता येऊ लागला. जनता बझार सुरु करुन शहरातील व अन्य ठिकाणच्या खास करुन मध्यवर्ती ग्राहकांच्या अडचणी दुर केल्या. ग्राहकांच्या मागणीची पूर्तता होऊ लागली. आधुनिक युगामध्ये ग्राहकांची रोज होणारी घाईगर्दी यामुळे ग्राहकांकडून चांगला प्रतिसाद मिळू लागला. या जनता बझारमुळे कोल्हापूर शहरातील खाजगी दुकानदारांच्या विक्रीवर विपरीत परिणाम होऊ लागला. काही खाजगी दुकानदारांनीसुध्दा स्वयंसेवा व मालाचा पुरवठा पॅकींगमधून करण्याचे अनुकरण करण्यास सुरुवात केली आहे.

आपणांस गावागावातून जनता बझार, ग्राहक भांडार यासारख्या स्वच्छ किफायतशीर भावात वस्तू विकणाऱ्या संस्था काढून अन्य व्यापाऱ्यांना ग्राहकांना लुबाडण्यापासून दुर ठेवले व किंमतीवर नियंत्रण ठेवून ग्राहकांची लूट थांबवली.

## कोल्हापूर जिल्हा शेतकरी विणकरी सहकारी सूत गिरणी लि., इचलकरंजी ( जिल्हा कोल्हापूर )

कोल्हापूरच्या मातीला उत्पादनाचा व सृजनाचा गंध आहे. तर येथील माणसाला उद्योगाचा छंद आहे. कोल्हापूरच्या माणसाच्या पायात जमीन व हातात मशीन आहे. या दोहोंचे सूत साधून शेतकरी व कारागीर विणकऱ्यांचे सूत जमविण्याचा सूतकारखाना उभारण्याचा ध्यास रत्नाप्पा कुंभारांनी घेतलेला होता.

शेतकरी विणकऱ्यांचे हे संगमस्थान या भागातील ऊस पिकाला पर्यायी पिक होऊ शकेल अशा उत्तम कापसाची लागवड करण्याची महत्वाकांक्षा या भागातील शेतकऱ्यांनी धरली व त्या कापसाच्या पिकाला ऊस पिकासारखी शाश्वतीची आवश्यकता होती. या संगमस्थानाच्या अलिभक्ती विणकरांचा धन्दा हा कोल्हापूर जिल्ह्याचा पूर्वापार चालत आलेला वैभवशाली धन्दा होता.

आज कोल्हापूर जिल्हामध्ये जवळ जवळ ५५ हजार यंत्रमाग १५ हजार हातमाग आहेत. या धन्द्यासाठी लागणारा कच्चा माल म्हणजे सूत याची आयात देशाच्या

इतर ठिकाणाहून करावी लागत होती. बाहेरुन पुरवठा केल्या जाणाऱ्या सूताच्या किंमतीमध्ये होणारे फेरबदल त्याचप्रमाणे आवश्यक त्या प्रमाणात सूत पुरवठा होण्याची शाश्वती नसल्याने या धन्द्यावर संकटाची टांगती तलवार कायमची होती.तसेच या विणकरांच्या धन्द्याला कायम स्वरुपाची शाश्वती हवी होती व प्रगतीकडे धाव घेणाऱ्या भागातील शेतकऱ्यांच्या व विणकऱ्यांच्या जीवन मरणाचा प्रश्न होता. म्हणून कापूस उत्पादक शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादित कापसास योग्य दर मिळावा व वस्त्र विणणारा विणकरी यांना योग्य दरात सूत मिळावे व या सूतापासून निर्माण होणारे कापड प्रत्यक्ष कापड वापरणाऱ्या ग्राहकास कमीत कमी दरात उपलब्ध होणे आवश्यक होते. त्यासाठी कापूस,सूत व कापड खरेदी-विक्री करणारे खाजगी व्यापारी जे भरमसाठ नफा घेऊन हा व्यवहार करतात त्याना या व्यवहारातून बाजूला केल्यास उत्पादक व ग्राहक यांचा सरळसरळ संबंध निर्माण केल्यास मध्यस्थ व्यापाराला मिळणारा नफा उत्पादक व ग्राहकास मिळेल या तत्वावर आधारभूत असलेली व सहकारी क्षेत्रातील भारतातील सर्व प्रथम सूतगिरणी १९६४ ला रजिस्टर झाली.

स्वातंत्र्योत्तर काळात कार्यकर्त्यांच्या पुढे हे एक आव्हान होते. विणकरी व शेतकरी आज पर्यन्त कधीही एकत्र आलेले नव्हते. या दोघांचे हित संबंध अवलंबून ठेवल्यास आपले नुकसान होईल ही विवंचना या दोन्ही घटकांना भेडसावत होती. अशा दोन्ही घटकांना म्हणजे कापूस पिकवणारा शेतकरी आणि विणकरी या दोघांना प्रथम एकत्र आणून कार्य प्रवृत्त करण्याचे काम कोल्हापूर जिल्ह्याचे मान्यवर नेते रत्नाप्पा कुंभार यांचे समर्थ व कुशल मार्गदर्शनाखाली केले. या दोन घटकांच्या समन्वयातून हे आव्हान विचारपूर्वक आण्णानी स्वीकारले. परस्परांच्या प्रगतीसाठी ही संयुक्त मालकीची सूतगिरणी उभारणीस सुरुवात झाली.

या गिरणीच्या प्रत्यक्ष कामात दि. २६ डिसेंबर १९६३ रोजी गुरुपुष्य नक्षत्राच्या शुभ दिवशी औद्योगिक परवाना मिळविण्यासाठी रीतसर अर्ज भारत सरकारकडे पाठविण्यात आला. ५ लाख रु.प्राथमिक भाग भांडवल जमा करुन तारीख २७ जानेवारी १९६४ रोजी सहकारी कायद्याखाली संस्थेचा नोंदणी अर्ज महाराष्ट्राचे मुख्यमंत्री व श्री वसंतरावजी नाईक यांना सादर करण्यात आला. भारत सरकारकडून आवश्यक तो औद्योगिक परवाना क्र. ४ । २३(आय)८०३ । ६४-एलईआरई(ब) चा

तारीख ५ मे १९६४ रोजी मिळाला. संस्था १७ ऑगस्ट १९६४ रोजी महाराष्ट्र सहकारी कायद्याखाली क्रमांक केपीआर । पीआरजी(आय)१ ने नोंदविण्यात आली. ड्राईंग व रोव्हिंग फ्रेम्सची यंत्र सामुग्री आयात करण्याचा परवाना मिळविण्यात आला. आणि इचलकरंजी शहराच्या सीमे लगत जयसिंगपूर रस्त्यावरील यड्राव गावच्या हद्दीत १११ एकर १२½ गुंठे जमिन खरेदी करण्यात आली. फॅक्टरीसाठी तसेच पिण्याच्या पाण्यासाठी कायमची व चांगली सुविधा व्हावी म्हणून पंचगंगा नदीवर संस्थेने स्वत:चे जॅकवेल बांधून नळावाटे जागेपर्यन्त पाणी आणले आहे.या पाण्याच्या सोईमुळे कापसाचे ट्रायल प्लॉट घेण्यात आले.त्याशिवाय कापसाच्या जिनिंगसाठी जिनिंग फॅक्टरी व जीन गोडाऊन बांधलेल्या आहेत.ऑफिस, ईमारत,कॅन्टीन,रेस्टहाऊस,कामगार गेस्ट हाऊस व कं होम,कॉटन वेस्ट गोडाऊन ,ड्यूटी पेड गोडाऊन,स्टाफ क्वार्टर्स इ.इमारती आवश्यकतेप्रमाणे बांधल्या.सूत उत्पादनासाठी १ लाख ६० हजार स्क्वे.फूट जागेत गोडाऊन वर्क शॉप ,बॉयलर इ.साठी ४० हजार स्क्वे.फूट जागेत वरील इमारती बांधल्या आहेत. या कारखान्याच्या सभासदामध्ये दोन व चार शेअर धारण करणारे ८५ टक्के सभासद आहेत. १ व २ एकर शेती असणारे अधिक २ व ४ भाग असलेले ७५ टक्के सभासद या कारखान्यामध्ये आहेत. त्यावरुन ही सूतगिरणी सामान्य शेतकरी व विणकरी यांची असल्याचे दिसून येते.

कोल्हापूर जिल्हा शेतकरी विणकरी सहकारी सुत गिरणी लि.,
इचलकरंजी जिल्हा कोल्हापूर यांचे पहिले संचालक मंडळ --

१ दे.भ.रत्नाप्पा भरमाप्पा कुंभार - चेअरमन, निमशिरगांव, उत्पादकांचे सभासदांचे प्रतिनिधि
बी.ए.,

२ श्री मुगेंद्र शिरनाप्पा सुलतानपुरे - व्हा.चेअरमन, इचलकरंजी, विणकरी सभासदांचे प्रतिनिधि
बी.ए.,एलएल.बी.

३ श्री रघुनाथ यशवंतराव देसाई-संचालक - रांगोळी - उत्पादक सभासदांचे प्रतिनिधि

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४ | श्री शामगोंडा बाबगोंडा पाटील | - संचालक - | यड्राव-उत्पादक सभासदांचे प्रतिनिधि | |
| ५ | श्री रामचंद्र बंडोपंत नलावडे - | ,, | नांदणी | --,,-- |
| ६ | श्री महादेवराव ज्ञानोबा लायकर | ,, | इचलकरंजी विणकरी उत्पादक सभासदांचे प्रतिनिधि | |
| ७ | श्री शंकरराव गणपती डंबाळ | ,, | ,, | --,,-- |
| ८ | श्री नेमचंद रावजी शहा | ,, | ,, | -,,-- |
| ९ | श्री नारायणराव लक्ष्मण बडवे | ,, | ,, | --,,-- |
| १० | श्री बाळगोंडा तुकाराम पाटील | ,, | ,, | --,,-- |
| ११ | श्री परिसाप्पा भरमाप्पा डोंगरे | ,, | हुपरी - सहकारी संस्थांचे प्रतिनिधि | |
| १२ | श्री बाळासो तवनाप्पा चिवटे | ,, | इचलकरंजी - तज्ञ प्रतिनिधि. | |

<u>शेतकरी विणकरी हे नाव देण्याचा उद्देश --</u>

कापूस पिकवणारा शेतकरी व कापड विणणारा विणकरी यांच्या संयुक्त मालकीची भारतातील पहिली व एकमेव सूतगिरणी आहे. १९६३-६४ मध्ये औद्योगिक परवाना मिळालेल्या १४ सहकारी गिरण्यांच्या समूहातील सर्वांत शेवटी नोंदणी केलेली ही सूतगिरणी सर्वप्रथम उत्पादनास सुरुवात करणारी ठरली. या सूतगिरणीची उभारणी करीत असताना समाजातील आर्थिकदृष्ट्या वंचित घटकांना सामावून घेण्याचा हेतुपुरस्सर प्रयत्न आण्णांनी केला. संस्थेच्या एकूण शेतकरी, विणकरी सभासदांपैकी ८० टक्के हून अधिक सभासद १ भाग धारण करणारे आहेत व त्यामुळे ख-याखु-या अर्थाने ही गिरणी सामान्य लोकांनी उभारली आहे हे दिसून येते.

या सूतगिरणीमध्ये कर्मचा-यांची भरती ग्रामीण भागातून करण्याचे ध्येय रत्नाप्पा कुंभारांचे होते. कापूस पिकवणा-या शेतक-यापासून कापड विणणा-या विणक-याच्या उत्पादित कापडाच्या विक्री करेपर्यंतच्या काळातील सर्व प्रक्रियेमधील परावलंबित्व व असाहाय्यता यामुळे होणारे शोषण थांबवून शेतकरी व विणकरी यांच्या श्रमाचा मोबदला संपूर्णपणे त्यांच्या पदरात पडू शकेल असे महत्वाकांक्षी

व मूलभूत महत्वाचे ध्येय साध्य करण्याचा प्रयत्न रत्नाप्पा कुंभार सतत करीत आहेत.

कापूस उत्पादनास चालना --

कापसाचे क्षेत्र वाढविण्यासाठी १९६८ पासून प्रयत्न चालू आहेत. संस्थेच्या जागेमध्ये त्याच प्रमाणे गावोगावच्या शेतकऱ्यांच्या शेतात ट्रायल प्लॉट घेऊन कापसाचे पिक अत्यंत किफायतशीर असल्याचे सर्वांना निदर्शनास आणून दिले आहे. तांत्रिक ज्ञान मिळविण्यासाठी अखिल भारतीय स्वरुपाचे कापूस पिक, परिसंवाद आयोजित करण्यात आले. शेतकऱ्यांना दैनंदिन मार्गदर्शन मिळावे म्हणून कापूस विकास अधिकारी, फिल्ड सुपर वायझार यांची नियुक्ती करुन सभासदांना मार्गदर्शन करुन अडीअडचणींचा विचार करण्यासाठी संचालकाची एक कापूस विकास समिती तयार करण्यात आली. या विभागातर्फे शेतकऱ्यांना चांगल्या प्रतीचे बियाणे, खते, औषधे देण्यात आली होती.

आण्णांचे कामगार भरतीचे धोरण --

सूतगिरणीमध्ये कामगार भरती करत असताना जाणिवपूर्वक आण्णांनी पावले उचलली आहेत. कामगारांनी खेडेगांवातून रोजगारीसाठी शहराकडे धाव घेण्याचे बंद व्हावे यादृष्टीने खेड्यातील अशिक्षित तरुणांना तसेच एस.एस.सी. पास झालेल्यांना विद्यावेतन देऊन कामास तयार करुन घेतले आहे. या योजनेमुळे हजारो सुशिक्षित कामगार तयार झाले आहेत. एकूण कामगारां पैकी ४१ टक्के कामगार मागासजातीजमातीतील आहेत. तसेच कामगारांना इतरत्र धन्द्यात दिला जाणारा पगार व सोलापूर इंडेक्स १०० टक्के, शिवाय काळे आयोगाच्या शिफारशींची कालेिप्रमाणे अंमलबजावणी आण्णांनी केली.

१) कुशल कामगाराप्रमाणे कुशल संकेत ग्रामीण भागातील घेतले आहेत.

२) गिरणीने कामगारांच्या क्रेडिटवर सोसायटीला नाममात्र व्याजाने कर्ज दिले आहे.

३) कामगारांच्या सांस्कृतिक वृध्दीसाठी व त्यांना सामाजिक जबाबदारीची जाणिव या हेतूने सार्वजनिक वाचनालय सुरु केले. तसेच प्रती वर्षी

महाराष्ट्र राज्य नाट्य-स्पर्धा, कामगार राज्य नाट्य-स्पर्धा यामध्ये गिरणीमार्फत भाग घेतला जात आहे. संस्थेचा कबड्डी संघ चांगला असून या भागात नावाजला आहे.

कोल्हापूर जिल्ह्यातील सामान्य व आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या समाजाला सर्वार्थाने समर्थ बनविण्यासाठी या प्रकल्पाची उभारणी संस्थेचे संस्थापक रत्नाप्पा कुंभार यांनी केली. त्यांच्या कुशल नियोजनाचा दूरदृष्टीचा लाभ या प्रकल्पात झाला. तसेच प्रकल्प ईमारतील त्यानी घेतलेले कष्ट वर्णनातीत आहे. रत्नाप्पाण्णा कुंभार यांचे नेतृत्वाखाली संस्थेने आर्थिक आघाडीवर प्रगती केलेली असून प्रतिवर्षी नफा मिळविलेला आहे. आर्थिकदृष्ट्या अत्यंत भक्कम पायावर ही गिरणी उभी आहे. या सुतगिरणीची सभासद संख्या व भागभांडवलातील प्रगती पुढील कोष्टकावरुन दिसून येते.


कोल्हापूर जिल्हा शेतकरी विणकरी सहकारी सूत गिरणी लि.,

सी.क्र.३.४ इचलकरंजी, ता. शिरोळ, जिल्हा - कोल्हापूर

| अ.नं. | साल | सभासद संख्या | सभासद संख्या टक्केमध्ये | भाग भांडवल | भाग भांडवल टक्केमध्ये |
|---|---|---|---|---|---|
| १ | १९६७-६८ | २,३६३ | ३.८७ | ६२,५९,४६५ | ८.२३ |
| २ | १९७२-७३ | ६,१८७ | १०.१५ | ७९,१२,७५० | १०.३९ |
| ३ | १९७७-७८ | ७,२४५ | ११.८९ | ९६,५५,५०० | १२.६७ |
| ४ | १९८२-८३ | १०,०५९ | १६.५१ | १,४६,९७,५०० | १९.३० |
| ५ | १९८७-८८ | १६,४९३ | २७.०७ | १,८५,०९,५०० | २४.३० |

१९६७-६८ मध्ये सभासद संख्या २,३६३ होती ती १९८७-८८ मध्ये १६,४९३ झाली. गेल्या २० वर्षांमध्ये यामध्ये २३.२० टक्के नी वाढ झालेली दिसून येते.

कोल्हापूर जिल्हा शेतकरी विणकरी सहकारी
सूत गिरणी लि. इचलकरंजी
(भाग भांडवल) प्रमाण :- १ से.मी. = १५००० भाग भांडवल





आ क्र ३·६

## कोल्हापूर जिल्हा शेतकरी विणकरी सहकारी सुत गिरणी लि. इचलकरंजी

### (सभासद संख्या)

प्रमाण :- १ से.मी. = १५०० सभासद




आ.क्र. ३७

त्याचप्रमाणे १९६७-६८ मध्ये भागभांडवल ६२,६९,४६५ होते ते १९८७-८८ मध्ये १,८५,०९,५०० झाले असून गेल्या २० वर्षांमध्ये यामध्ये १६.०७ नी वाढ झालेली दिसून येते.

विस्तार योजना --

| | सन | चात्यांची संख्या | एकूण खर्च(रुपये ) |
|---|---|---|---|
| १. | १९६८ | मूळ २५,०८० चात्यांसाठी | १,८६,२८,६१६-०८ |
| २ | १९७७ | प्रथम २५,०८० चा.वि. योजनासाठी | २,४९,५७,६९४-४९ |
| ३. | १९८१ | द्वितीय १२,७६८ चा.वि.योजनासाठी | १,१२,०६,५३३-७३ |
| ४ | १९८३ | तृतीय १२,३१२ चा.वि.योजनासाठी | २,३५,२६,९७१-९० |
| | | एकूण | ७,८३,१९,८१६-९० |

सूताची उलाढाल ( उत्पादन )

२६ जून १९६८ रोजी सूत उत्पादनास प्रारंभ झाला. त्यानंतर १९६८ रोजी विणकर सभासदामध्ये लिलाव पद्धतीने सूताचे वाटप करण्यात आले. सध्या गिरणीमध्ये ४० व ६० नंबरचे डभार कोम्ब तसेच ३० नंबरचे सिंगल डभार वार्प सूताचे उत्पादन चालू असून बाजारामध्ये प्रथम दर्जाचे सूत म्हणून वाखाणले जात आहे. दिवसेंदिवस या सूताची मागणी वाढत आहे. सध्या होणारे सूताचे उत्पादन हे सर्व विणकर सभासदांना त्यांच्या शेअरच्या प्रमाणात देता येणे शक्य नसल्याने विणकर सभासदांमध्ये लिलाव पद्धतीने सूत विक्री करण्याची पध्दत तात्पुरती अवलंबिली आहे.

सूत उत्पादन व विक्री --

सूत गिरणीची क्षमता सभासदांची सूताची गरज कापसाची उपलब्धता सूत बाजारातील परिस्थिती यांचा समन्वय साधून सूताचे उत्पादन केलेले आहे.

सूताला उत्पादन मूल्यापेक्षा जास्त विक्री दर मिळण्याबाबत सर्वतोपरी प्रयत्न करण्यात आलेला आहे. कापसाच्या अनियमित दरवाढीमुळे त्याचप्रमाणे सूत बाजारातील असणारे परिस्थितीमुळे सूतास योग्य दर मिळू शकले नाहीत.

निर्यात योग्य सूताचे उत्पादन --

कापूस, सूत व कापड या तिन्ही क्षेत्रात अनियमित तेजी मंदी होत राहिल्याने मार्केटमधील संतुलन बिघडल्यामुळे उत्पादन खर्चा पेक्षा विक्रीचे दर कमी मिळू लागले. या कारणामुळे केन्द्रशासनाने सूताचे निर्यातीस प्रोत्साहन दिले. तसेच परदेशी बाजारपेठेतही भारतीय सूताची मागणी वाढली. या निर्यात योग्य सूताला येथील मार्केटमध्ये दर जास्त मिळत असल्याने नोव्हेंबर १९८६ पासून निर्यात योग्य उत्पादनास सुरुवात झाली आहे. निर्यात सूत आंतरराष्ट्रीय दर्जाचे तयार करण्यासाठी अत्यावश्यक असलेली यंत्रसामुग्री घेऊन अल्पावधित निर्यात सूताची निर्मिती व विक्री संस्थेने केली आहे. या सूत गिरणीत सूत तयार करुन परदेशात निर्यात केली जाते. त्यापैकी एक किलो सूत रिजेक्ट झालेले नाही. परदेशातून 'शेतकरी' सूतासाठी येत आहेत. संस्था एजंटामार्फत सूत निर्यात करीत असते. या एजंटाला परदेशातून ज्या ऑर्डर मिळतात त्यामध्ये 'शेतकरी सूत' असा उल्लेख करण्यात येतो. आंतरराष्ट्रीय मार्केटमध्ये 'क्वालिटी यार्न' म्हणून ओळखले जाते.

संस्थेने १९८७-८८ मध्ये १२,३९,२८४ किलो निर्यात योग्य सूत तयार करुन १२,३८,३२९ किलो सूत वेस्ट जर्मनी, पूर्व युरोपियन देश, इटली, बांगला देश, हाँगकाँग, जपान, बेल्जियम, हंगेरी, पोर्तुगाल या देशांना निर्यात केले आहे. निर्यात सूतातील या विक्रमी कामगिरीबद्दल दि ऑल इंडिया फेडरेशन ऑफ को.ऑप. स्पिनिंग मिल्स, लि., मुंबई यांनी अखिल भारतीय पातळीवरील 'एक्सपोर्ट ॲवॉर्ड' सूत गिरणीस दिलेले आहे.

कापूस उत्पादन --

या सूत गिरणीसाठी १९८७-८८ साली सुमारे दरसाल दहा लाख किलो पक्क्या कापसाची आवश्यकता होती. त्यापैकी ... किलो लांब

BALASAHEB KHARDEKAR LIBRARY SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

धाग्याचा परदेशी कापूस लागणार होता.बाकीचा लांब व मध्यम धाग्याचा देशी कापूस लागणार होता. देशी कापसाची पूर्तता करण्याकरिता ५ ते ६ हजार एकरामध्ये सूत गिरणीच्या सभासदांना कापसाची लागवड करणे गरजेचे होते. सभासदांनी देवीराज,लक्ष्मी या लांब धाग्याच्या कपाशीच्या जातीचे लागवड करण्याचे ठरविले व एका एकराला एक शेअर याप्रमाणे ६ हजार शेतकरी सभासदांना शेअर्स देण्याची तरतूद करण्यात आली. सूतगिरणीच्या वतीने या कामी सुबद्ध अशी कामाची आखणी करण्यात आली. त्याची व्यवस्था करुन घेण्यासाठी कापूस पिक तज्ञ म्हणून सरकारकडून प्रतिनियुक्तीवर श्री.राजाराम सखाराम कुंभार यांना सूत गिरणीकडे नियुक्त करण्यात आले. कपाशीची लागण जोपासना त्याला लागणारी खते, त्याचा वापर,करावी लागणारी अंतर्गत मशागत व जमिनीची निगा,कपाशीवर पडणारे रोग व निरनिराळी किड यावर वापरावयाची औषधे याची माहिती असलेली एक मार्गदर्शक पुस्तिका राजाराम सखाराम कुंभार यांनी तयार केली ती पुस्तिका छापून सभासदांना देण्याची व्यवस्था केली.

कापूस पिकाचे क्षेत्र कोल्हापूर जिल्हात वाढावे व गिरणीस लागणाऱ्या देशी कापसापुरते स्वावलंबी व्हावे या उद्देश्याने आण्णांनी कापूस विकास योजना हाती घेतली आहे.

<u>कापूस विकास योजना --</u>

१) <u>प्रायोगिक प्लॉट --</u>

सूतगिरणी भागातील हवामानात अनुकूल अशा लक्ष्मी व देवीराज या जातीचा कापूस या क्षेत्रात उत्तम प्रकारे येतो. या जाती लांब धाग्याच्या असल्याने गिरणीस उपयोग होतो.

२) सी.आयर्लेन्ड ॲन्ड्रुज, कोपूरा या जातीचा कापूस लांब धाग्याचा व उत्तम असून त्याचे उत्पन्नही चांगले येते. परंतु या जाती अत्यंत नाजूक असल्यामुळे या जातीची लागण हंगाम ठरविण्यासाठी प्रयोग म्हणून केली आहे.

३) सभासदांकडील कापूस --

कपाशी लागवडीस प्रोत्साहन मिळावे म्हणून बाजारभावापेक्षा त्यांना जास्त दर दिला. लक्ष्मी व देवीराज या कपाशी उत्पादनाची शेतकऱ्यांना अपुरी माहिती, किड व रोग यापासून होणारे नुकसान व त्याचा बंदोबस्त वेळेवर पाणी-पुरवठा, खत-पुरवठा यांची पूर्ण माहिती नसूनसुद्धा एकरी उत्पन्न चांगले आहे.

४) कापूस पीक संरक्षण योजना --

१) फिल्ड ऑफिसर --

कपाशी पिकाचे क्षेत्रानुसार वेगवेगळे विभाग निर्माण करून त्या ठिकाणी विभागीय कार्यालये उघडण्यात आली आहेत. सभासदांना तांत्रिक मार्गदर्शन त्वरित उपलब्ध व्हावे व कपाशी पिकांचे योग्य संवर्धन ,जोपासना व्हावी म्हणून फिल्ड सुपरवायझर्स त्यांच्या कपाशी प्लॉटना नेहमी भेट देऊन मार्गदर्शन करीत असतात.

२) स्कॉड पध्दतीने औषध फवारणी --

या विभागात कापूस पिकवणारे शेतकरी सभासद हे नवीन असल्याने,तसेच त्यांच्या कपाशी पिकावरील रोग-किड यांची पूर्ण माहिती नसल्याने त्यांचेकडून पिकावर फवारणी वेळेवर होऊ शकेल अशी खात्री नसल्याने १९८४-८५ पासून कपाशी पिकावर स्कॉड पध्दतीने औषध फवारणी करून दिली जात असून फवारणीचे एकूण बिलावर ५० टक्के सबसिडी दिली जाते यामुळे कपाशी क्षेत्र वाढीस मदत झाली आहे.

३) बियाणे वाटप व लागण क्षेत्र --

सभासदांना कपाशी बियाणे गिरणीकडे येऊन घेऊन जाणे अडचणीचे व खर्चाचे होणार असल्याने त्यांची अडचण व गरज लक्षात घेऊन त्यांचे मागणीनुसार बियाणे त्यांचे गावी घरपोच करण्याची व्यवस्था फिल्ड सुपरवायझर्स मार्फत केलेली आहे. कापूस विकास योजना प्रभावी होण्यासाठी कापूस विकास अधिकारी

फिल्ड सुपरवायझार्स यांची नियुक्ती केली व कापूस विकास समिती स्थापन केली.

कापूस विकास समिती प्रतिवर्षी योजनेचा आराखडा तयार करते या पध्दतीमुळे सभासदांना मार्केटमधील दरापेक्षा स्वस्त दरात बियाणे, औषधे, खते मिळू शकतात. तसेच हा माल उधारीने दिला जातो. त्याची रक्कम त्यांच्या येणाऱ्या कापसाच्या बिलातून कपात करून घेण्यात येते. याशिवाय सभासदांना तांत्रिक मार्गदर्शन त्वरित उपलब्ध व्हावे म्हणून फिल्ड सुपरवायझार्स त्यांच्या प्लॉटला नेहमी भेट देत असतात. तसेच प्रत्येक उत्पादक सभासदाला कापूस पिक घ्यावे म्हणून प्रोत्साहनात्मक अनुदान दिले जाते.

कापूस पिकाची वाढ व्हावी या उद्देश्यापाठीमागे संस्थेस कापूस मिळावा इतकी मापकअपेक्षा आपणांची व त्यांच्या संचालक मंडळाची नव्हती तर आपल्या भागात उसाच्या पिकामुळे जमिनीची प्रत खाली गेली आहे ती सुधारणे हा मुळ उद्देश होता. उसाच्या प्रतिवर्षी लागवडीमुळे जमिनी खराब होतात कापूस पिक हे उसाला बेवड म्हणून अतिशय उपयुक्त आहे. तसेच आपल्याकडील जमिनी चांगल्या प्रतिच्या असल्याने लांब धाग्याचे पिक अतिशय चांगले येते तसेच उत्पन्नही चांगले मिळते.

सभासदांना मुख्य पिकाबरोबर इतर पूरक पिके घेता यावीत व त्यासाठी मार्गदर्शन व्हावे म्हणून संस्थेने आपल्या जागेत पालेभाज्या व द्राक्षे, पेरू, नारळ, आंबा, चिक्कू, डाळींब, इ. फळबागा केलेल्या आहेत.

<u>सेवक, कामगार व कामगार कल्याण --</u>

सूत गिरणीचे कार्डींग आणि स्पिनिंग मास्तर यांच्या नेतृत्वाखाली काम करण्यासाठी जरूर ती ऑफिस स्टाफ आणि कामगार याची नियुक्ती करण्यात आली आहे. सूत गिरणीत जो नोकरवर्ग नेमून घेण्यात आला आहे तो बहुतेक आपल्या गिरणीच्या कार्यक्षेत्रातील आहे. अनुभवी कामगारांच्या बरोबरीने काम करण्यासाठी शिकाऊ म्हणून एस.एस.सी. व आय.टी.आय. झालेले तरुण घेण्यात आलेले आहेत. यावरून असे दिसते की आसपासच्या कार्यक्षेत्रातील कामगारांना सूत गिरणीत काम देऊन बेकारी नष्ट केली तसेच

आपला भाग आण्णांनी सधन व समृध्द बनवला. त्याच प्रमाणे द्रशिक्षित कामगार नेमून सुबक मालाच्या निर्मितीस आण्णांनी प्रोत्साहन दिले. उत्पादन व मशिनरीची उभारणी या विभागासाठी कामगार घेतले हे कामगार घेताना मुंबईतील आणि इतरत्र बंद पडलेल्या ज्या कापड व सूतगिरण्या आहेत त्यामधील सरकारच्या धोरणास अनुसरुन कामगार घेण्याचे धोरण ठेवण्यात आलेले आहे.

सूत गिरणीचे संस्थापक व चेअरमन मा. रत्नाप्पा कुंभार यांनी कामगारांबद्दलचा दृष्टीकोण पुढील शब्दात स्पष्ट केलेला दिसतो.

" आपल्या भारतातील प्रत्येक नागरिकाने देशासाठी कार्य करण्याची गरज आहे. प्रत्येकाने आपण ज्या ठिकाणी काम करतो त्या कामातून देश सेवा करावयाची असते. नागरिकाने किमान तीन जबाबदाऱ्या पार पाडण्याची आवश्यकता आहे. पहिली म्हणजे आपण ज्या ठिकाणी नोकरी करतो ती नोकरी प्रामाणिकपणे केली पाहिजे कारण आपण उत्पादन केलेला माल हा आपल्या सारख्याच इतर नागरिकांना वापरावयाचा असतो म्हणून आपण उत्पादित माल हा दर्जेदार होण्याकडे त्याचप्रमाणे उत्पादन जास्त होईल याकडे पहाण्याची आवश्यकता आहे. हे कर्तव्य प्रत्येकाने पार पाडल्यास राष्ट्रीय उत्पादन वाढून त्याचा देशाला व पर्यायाने आपणासच फायदा होणार आहे. दुसरी महत्वाची जबाबदारी आपल्या स्वतःच्या कुटूंबाची वैयक्तिक जबाबदारी होय. आपल्या देशात या जबाबदारीला अनन्यसाधारण महत्व आहे. आपल्या देशात फक्त आपल्या बायकामुलांच्या कल्याणाकडे पाहून चालत नाही. तर आपले आई-वडिल यांचे उतार वयात पोषण, बहिण भावांचे शिक्षण, विवाह इ. जबाबदारी असते म्हणून प्रत्येक कामगाराने नोकरीचे कर्तव्य पार पाडल्यानंतर आपल्या कुटूंबाकडे जाणीवपूर्वक लक्ष देवून प्रत्येक व्यक्तीच्या विकासाकडे लक्ष देण्याची गरज आहे. या महत्वाच्या जबाबदारी नंतर तिसरी जबाबदारी ही सामाजिक कर्तव्याची आहे. प्रत्येकाने समाज हा सर्वांचा मिळून झालेला आहे याचे भान ठेवून आपली नोकरी धन्द्याची आणि कौटुंबिक जबाबदारी व्यवस्थित पार पाडीत असताना सामाजिक बांधिलकीची जाणीव ठेवली पाहिजे. प्रत्येकाने स्वाभिमानाने समाजात आपली मते व्यक्त करुन सतत अन्यायाविरुध्द लढा देण्यास सज्ज असले पाहिजे. सामाजिक

अन्याय होत असताना कोणत्याही व्यक्तीने माघार न घेता सत्याच्या बाजूने आपली मते ठामपणे मांडण्याची खरी गरज आहे कारण स्कृतदर्शनी अशा अन्यायाची झळ आपणास ताबडतोबीने लागली नाही तरी अन्याय करणाऱ्यांची संख्या वाढू लागल्यानंतर मग सत्याच्या आणि न्यायाच्या बाजूकडे कोण पहाणार व सत्य आणि न्यायाचे रक्षण कोण करणार म्हणूनच अन्याय लहान स्वरुपात असो अगर मोठ्या स्वरुपात असो त्या विरुध्द झगडण्याची नेहमी तयारी ठेवली पाहिजे. या तीन जबाबदाऱ्या भारतातील सर्व नागरिकांनी सांभाळल्या तर आपल्या स्वतंत्र भारताचे पुनरुत्थानाचे स्वप्न लवकरात लवकर साकार होण्यास मदत होणार आहे.

रत्नाप्पा कुंभारांच्या या विचार धोरणातूनच गिरणीने कामगारांना सर्व प्रकारच्या सोई सवलती उपलब्ध करुन दिलेल्या आहेत.

स्वस्त धान्य विभाग --

गिरणीने कामगारांना जीवनावश्यक वस्तू वाजवी भावात पुरविण्यासाठी ना नफा ना तोटा या तत्वावर स्वस्त धान्य दुकान विभाग उघडलेला आहे.

या कामगारांना या उद्योगधन्द्यात इतरत्र देण्यात येणारे पगार, महागाई भत्ता, निरनिराळे ॲवॉर्डस, पगारी रजा, हक्काच्या रजा, प्रॉ. फंड इ.इ.एस.आय., निवृत्ती वेतन देण्यात येते. याशिवाय प्रतिवर्षी बोनस व एक्सग्रेशियाची रक्कम इतर कोणत्याही सहकारी सूतगिरणी पेक्षा जादा दराने देण्यात आली आहे.[30]

संचालक मंडळ व कामगार यांचे सलोख्याचे व विश्वासपूर्ण संबंध वरील कार्यावरुन दिसून येतात. संस्था चालकांनी कापूस उत्पादक, सभासद, विणकर सभासद, याप्रमाणेच सेवक व कामगार यांचा महत्वपूर्ण घटक मानला आहे. आपण या सूत गिरणीचे केवळ कामगार नसून व्यवस्थापनातील एक घटक आहोत हे त्यांच्या कर्तृत्वाने दाखवून दिले आहे. कामगारांनी यंत्र सामुग्रीची पुरेपूर क्षमता उपयोगात आणून जास्तीत जास्त उत्पादन देण्याचे सेवक कामगारांचा प्रयत्न कौतुकास्पद आहे. या संस्थेचा कामगार आपल्या देशातील एक जबाबदार नागरिक व्हावा व स्वाभिमानाने जगावे याकरिता संस्था नेहमी कर्तव्य करित आली आहे. कामगाराची आर्थिक व सामाजिक दृष्टीने प्रगती व्हावी याकरिता संस्था प्रयत्नशील आहे.

आण्णांचे प्रत्यक्ष कार्याची कल्पना त्यांच्या कार्यातून वाचकांना येतेच. पण त्यांचे कार्य ज्यांनी पाहिले, भेटी दिल्या अशा अनेक मान्यवर नेत्यांनासुध्दा त्यांचे कार्य आवडले असून त्या बाबत व्यक्त केलेल्या प्रतिक्रिया खालीलप्रमाणे ----

१) सर्वोदयाद्वारे जे कार्य आम्ही हाती घेतले आहे त्यातील मानवसेवेचे, समाज सेवेचे श्रेष्ठ तत्व सहकारी क्षेत्रात सामावले गेले आहे. त्याची सांगड घातल्यास माझ्यासारख्या कार्यकर्त्याला काही काम राहाणार नाही हे मानव सेवेचे सुसंस्कृत मानव बनवण्याचे कार्य पंचगंगा सहकारी साखर कारखान्याचे आमदार रत्नाप्पा कुंभार यांनी सहकाऱ्यांच्या सहाय्याने अत्यंत प्रामाणिकपणे चालविलेले पाहून मला अतिशय आनंद झाला आहे अशा प्रकारचे चांगले काम भारतातील सहकारी क्षेत्रात सर्वत्र चालू झाले तर आम्हाला सर्वोदयाची चळवळ थांबवावी लागेल.

जयप्रकाश नारायण

२) १९४२ च्या लढ्यापासून मी रत्नाप्पा कुंभार यांना ओळखतो. त्यांनी स्वातंत्र्याच्या निर्वाणीच्या संग्रामात धैर्य, शौर्य, चिकाटी इ. गुण जे प्रकट केले ते कोणाच्याही मनात आदर निर्माण केल्याशिवाय राहात नाहीत. म्हणूनच सर्व लोक त्यांना क्रांतीवीर म्हणून संबोधू लागले. भारतीय स्वातंत्र्य सैनिकांपैकी विधायक कर्तृत्व आणि लढाऊपणा हे सारख्याच प्रमाणात ज्यांनी प्रकट केले त्यापैकी रत्नाप्पा कुंभार हे अग्रगण्य होय. सहकार क्षेत्रात त्यांनी केलेली कामगिरी सर्वश्रुत आहे. ग्रामीण भागातील जनतेला औद्योगिकरणाची फळे चाखण्याला मिळावीत आणि सुखी व्हावी ही त्यांची तळमळ आहे . निवडक थोर व्यक्तीमध्ये रत्नाप्पाअण्णांची गणना करावी लागेल.

वि. स. पागे.

अध्यक्ष, खादी ग्रामोद्योग महामंडळ.

३) श्री रत्नाप्पाअण्णा हे म. गांधींचे सच्चे अनुयायी आहेत. मातृभूमीची त्यांनी केलेली सेवा अजोड आहे. रत्नाप्पाअण्णा हीच एक महान प्रयोग - शाळा आहे. पुढील पिढ्यांना त्यांचे कार्य आदर्श राहील.

डॉ. विठ्ठलराव गाडगीळ, माजी मंत्री, भारत

४) श्रीयुत रत्नाप्पाण्णा कुंभार स्वतंत्र्य लढयातील एक थोर सेनानी लढमळीचे आणि जिद्दीचे कार्यकर्ते असून राज्याच्या विकासात विशेषतः सहकार क्षेत्रात त्यांनी मोलाचा वाटा उचलला आहे. त्यांच्या जीवन कार्यापासून तरुणांना मार्गदर्शन मिळेल.

डॉ. श्रीमती ललिताराव
माजी आरोग्यमंत्री, महाराष्ट्र.

५) ' साखर सम्राट ' शुगर लॉबी अशी नावे देऊन शहरी वृत्तपत्रातून साखर कारखानदारांचे एक विकृत रूप उभे केले जाते. आण्णांच्या सहवासात आल्यावर माझे गैरसमज दूर झाले. त्यांच्या सारखा माणूस दुसऱ्याशी अलिप्तपणाने वागला तरीही वावगे दिसणार नाही. मात्र हा माणूस सर्वांत मिसळणारा, तेही अंतरिक ओढी, त्याची ओढी कळती मान दुसऱ्याच्या हृदयाचा कानोसा घेत असते. त्यानी आपला जीवन कुंभ गुण समुच्चयाच्या सत्कर्माच्या अमृतबिंदूनी भरून काढला.

श्री भट, सहसंपादक योजना, सरचिटणीस,
महाराष्ट्र ज्योतिषा महामंडळ, मुंबई.

<u>मा. रत्नाप्पा कुंभारांच्या सहकार क्षेत्रातील कार्याचे मूल्यमापन --</u>

भारतामध्ये वेगवेगळ्या ठिकाणी समाज विकासाचे प्रयत्न वेळोवेळी झालेले आहेत. १९२० मध्ये एफ. एल. ब्रेनें यांनी गुरगाव प्रकल्प, १९२० मध्ये वर्धा जिल्ह्यातील सेवाग्राम येथे गरीब प्रकल्प सुरु करण्यात आले. १९३१ मध्ये गुरुदेव रविंद्रनाथ टागोर यांनी श्री निकेतन, गांधीजिंच्या तत्वज्ञानावर आधारलेली सर्वोदय योजना १९४८-४९ मध्ये मुंबई राज्यात चालू झाली. या योजनेस आचार्य विनोबा भावे यानी वाहून घेतले. या कार्यक्रमातून समाजकार्य मागासवर्गीयांची उन्नती, ग्राम - सुधारणा, सहकारी संस्था, आरोग्य स्वच्छता इ. गोष्टींचा पुरस्कार केलेला दिसतो. या योजनाचा प्रभाव रत्नाप्पा कुंभार यांच्यावर पडल्याने त्यानी या कार्यक्रमास मूर्त स्वरूप देण्याचा निश्चय केला. स्वतःची प्रगती स्वतःच केली पाहिजे. दुसऱ्यावर कोणत्याच बाबतीत अवलंबून राहाता कामा नये. या विचारातून आण्णांनी

विधायक कार्य केले. समाज विकास व सहकार या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत त्यामुळे समाज विकास करावयाचा असेल तर सहकारी संस्थाचा अभ्यास करावा लागतो याची जाणिव रत्नाप्पा कुंभार यांना होती. कारण दुर्बल शेतकऱ्यांसाठी, समाजासाठी व देशाच्या उन्नतिसाठी मनुष्यबळाचे योग्य नियोजन करुन योजनाबध्द रितीने सुखी जीवनाचा महामंत्र देणे आण्णांना गरजेचे वाटत होते. सर्वांचा विकास हे आण्णांचे साध्य असून सहकार हे साधन व सहकारातून शुचिता, सुसंस्कार घडविणे हे सुत्र आण्णांनी सांगितले. या साठी आण्णांना ऊस विकास, ऊस संवर्धन व संशोधन विकास केन्द्रे जिरायत जमिनी, बागायत करण्याचे योजना आखल्या. इंधनाचा प्रश्न सोडविण्यासाठी गोबर गॅस प्लॅंट बांधले. शेतीचे पाणी प्रश्न बऱ्याच प्रमाणात सोडवले. हरिजनांच्या जमिनी पाण्याखाली आणल्या. वृक्षारोपण, सामाजिक वनीकरणाला गती दिली. तसेच माती परीक्षणामुळे शेतकऱ्यांना जमिनीची प्रत समजू लागली. जमिन आम्ल होण्याच्या मार्गावर असेल तर जमिनीची वेळीच सुधारणा करता येऊ लागली. जमिनीत घालावयाच्या रासायनिक खतांचे अचूक प्रमाण निश्चित करुन शेतकऱ्यास योग्य मोबदला मिळवता येऊ लागला.

रत्नाप्पा कुंभारांच्या रुपाने महाराष्ट्राच्या राजकीय क्षितिजावर थोर व्यक्तीत्व उदयास आले. सर्वजण त्यांना "आण्णा" या नावाने ओळखतात. या नावात आस्था, आदर, औदार्य या सद्गुणांचा संगम झालेला आहे. पूज्य आण्णांच्या ठिकाणी थोर गरिबाविषयी कळवळा आहे. बहुजन समाजाच्या विकासाचा ध्यास आहे म्हणूनच त्यांनी धर्म, जात, वर्ण, वंश, भाषा, प्रदेश यांच्या भिंती नष्ट करुन एकसंध समाज निर्माण करण्याचा सतत होत्यात प्रयत्न केलेला आहे. त्यासाठी त्यांनी सहकारी तत्वावर पंचगंगा सहकारी साखर कारखाना, सहकारी सूत गिरणी या संस्था स्थापन केल्या. त्यांच्या मार्गदर्शनाखाली या संस्थांनी प्रगती साधली. परंतु काळाच्या ओघाबरोबर स्पर्धा वाढली. प्रतिष्ठापणास जाऊ लागली. निवडणूक हे अंतिम उत्तर ठरले. [redacted] रत्नाप्पा कुंभार हे राजकीय पुढारी आहेत. त्यांनी समाज कार्य, ग्रामीण विकास, सहकाराच्या माध्यमातून साध्य केलेला आहे त्यामुळे सहकारी संस्था आपल्या मार्गदर्शनाखाली असल्या पाहिजेत असे त्याचे मत असल्यामुळे त्यांनी स्थापन केलेल्या संस्थांच्या निवडणूकीत

त्यानी हिरीरीने भाग घेतला. त्यामुळे त्यांच्यावर बरीच टीका केली गेली. गेल्या काही वर्षांपासून त्यांना शत्रुत्व वाटल्याने विरोध होऊन त्याचा परिणाम उत्पादनावर झालेला दिसतो.

अलीकडच्या काही वर्षांपासून आण्णांच्या जवळचे सहकारी श्री शामराव पाटील यड्रावकर, श्री पी.बी.पाटील, श्री. दिनकरराव मुद्राळे, यांच्या व्यवस्थापनाबाबतीत संघर्ष निर्माण झाला असून याचा परिणाम म्हणजे त्यांच्यात फूट पडली व १९९१ च्या निवडणुकीत सूत गिरणी शामराव पाटील यड्रावकर यांचे गटाकडे आली. तर पंचगंगा सहकारी साखर कारखाना व के.डी. सी.सी. बँक रत्नाप्पा कुंभार यांचे गटाकडे आली. वर्तमानपत्रातून प्रतिस्पर्धी पक्षाची निवेदने, एकमेकांवर आरोप प्रत्याआरोप केल्याने त्यांच्यातील तणाव व स्पर्धा उग्र झाली. निवडणूक म्हणजे एकाची सरशी व दुसऱ्याची हार हे ठरलेले आहे. परंतु सहकारामध्ये अशी परिस्थिती फार काळ हितकारक नाही. स्पर्धेमुळे अनेक संस्था निर्माण झाल्या. त्याचप्रमाणे कामगार व प्रशासकीय सेवक असेच सामान्य माणसाचे नुकसान होत असते. आजच्या परिस्थितीत याला आळा घालणे आवश्यक आहे. जाणकार सभासद व शासन याबाबीकडे लक्ष देईल अशी आशा आहे. तथापि मा.आण्णांच्या आतापर्यन्त सहकारी क्षेत्रातील कार्याचा कोणासही विसर पडणार नाही. त्यांची जिद्द, चिकाटी, व कार्यकर्ते गोळा करण्याची हातोटी अनुकरणीय अशीच आहे.

प्रत्येक व्यक्ती ती व्यक्ती ज्या समाजात जन्मते त्या समाजाचे काहींना काही ऋण असते व त्यासाठी एखादे क्षेत्र निवडावे लागते. मग ती नोकरी असो, राजकारण असो अथवा समाजकार्य, मा.आण्णांनी राजकारणापेक्षा सहकाराद्वारे समाजकार्य अधिक केले आहे त्यामुळेच त्यानी समाजाची बांधिलकी खऱ्या अर्थाने पूर्ण केली असे म्हटले तरी वावगे होणार नाही.

SHIVAJI UNIVERSITY
LIBRARY
KOLHAPUR

## संदर्भ


१ प्रा.जोशी सी.जे. - सहकार - पृ.क्र.१

२ प्रा.रायखेलकर ए.आर.व प्रा.अशोक डांगे - सहकार तत्वे आणि व्यवहार - पृ.क्र.३

३ प्रा.जोशी सी.जे. - सहकार - पृ.क्र.२

४ --,,-- ५

५ किता ५

६ किता ५

७ प्रा.रायखेलकर ए.आर. व प्रा.अशोक डांगे - सहकार तत्वे आणि व्यवहार-पृ.क्र.११३

८ प्रा.जोशी सी.जे. - सहकार - पृ.क्र.९९

९ प्रा.रायखेलकर ए.आर. व प्रा.अशोक डांगे - सहकार तत्वे आणि व्यवहार - पृ.क्र.११५

१० एम.आर.पाटील - सहकार सुगंध - पृ.क्र.६

११ डॉ.अ.मा.सुतार - श्रीमंत नारायणराव बाळासाहेब घोरपडे इचलकरंजीकर - व सहकार चळवळ,पृ.३५

१२ दं.सागर - देशभक्त रत्नाप्पा कुंभार गौरव पुरवणी - पृ.क्र.१५

१३ श्री हिंदूराव वडो - नवरत्न - ७७ - स्मरणिका

१४ रा.तु.भगत - हे कुंभ अमृताचे - पृ.क्र.७

१५ दिनांक १४-१-१९७४ - श्री रत्नाप्पा कुंभारांचे भाषण - नागपूर

१६ दिनांक १८-११-१९७१ - श्री रत्नाप्पा कुंभारांचे भाषण - नासिक

१७ दिनांक १६-६-७० - श्री रत्नाप्पा कुंभारांचे भाषण - आजरा

१८ दिनांक १४-१-७४ - श्री रत्नाप्पा कुंभारांचे भाषण - नागपूर

१९ दिनांक १५-१-७४ श्री रत्नाप्पा कुंभारांचे भाषण - नागपूर

२० दिनांक १-२-७३ श्री रत्नाप्पा कुंभारांचे भाषण - रत्नागिरी

२१ कोठावळे कुमार - दे.भ.रत्नाप्पा कुंभारांचे आत्मचरित्र (अप्रकाशित )
कोल्हापूर

२२ श्री पंचगंगा सहकारी साखर कारखाना लि.गंगानगर,इचलकरंजी अहवाल
१. १९ वा वार्षिक अहवाल १९८३-८४
२. ३३वा वार्षिक अहवाल १९८७-८८-८९

२३ दै.सागर - दे.भ.रत्नाप्पा कुंभार गौरव पुरवणी -पृ.क्र.१५,१६,१७,१८ व
१९.

२४ क्रिडा सहकार रत्न - १९८५

२५ दि पिपल्स को.ऑप.बँन्क लि.,इचलकरंजी २८ वा वार्षिक अहवाल
१९८९-९०

२६ क्रिडा सरकार रत्न - १९८५

२७ कोल्हापूर जनता सेंट्रल को.ऑप.कंन्युमर्स स्टोअर्स लि.,द्वितीय वार्षिक
अहवाल

२८ कोल्हापूर जनता सेंट्रल कॉ.ऑप.कंन्युमर्स स्टोअर्स लि.,२८ वावार्षिक
अहवाल - १९८९-९०

२९ नाळे एम.एम. - कंन्युमर्स को.ऑप.मुव्हमेन्ट - जनता बझार इन कोल्हापूर
( अप्रकाशित )

३० कोल्हापूर जिल्हा शेतकरी विणकरी सहकारी सूत गिरणी लि.,
इचलकरंजी, जिल्हा कोल्हापूर ५ वा वार्षीक अहवाल
१९६७-६८ ते २५ वा वार्षीक अहवाल १९८७-८८.